रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १७६
www.ramprahar.com

◆ सोमवार, १२ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'व्हिजन २०३० पनवेल' मांडणार

### आज कळंबोलीत कार्यक्रम; नागरिकांशी थेट साधणार संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहराला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देणारे राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी (दि. १२) दुपारी ३ वाजता कळंबोली येथे नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. या वेळी ते 'व्हिजन २०३० पनवेल' ही संकल्पना



मांडणार असून पनवेलच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा नागरिकांसमोर सादर करणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांचा हा कार्यक्रम पनवेल महापालिका मैदान, भूमी गार्डेनियासमोर, सेक्टर १९, प्लॉट सी/२, कळंबोली येथे आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत पनवेलच्या भविष्यातील विकासदृष्टी मांडली जाणार असल्याने पनवेलकरांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध सिने अभिनेते प्रसाद ओक आणि सिने अभिनेत्री अमृता खानविलकर करणार आहेत.

# निवडणुकीच्या निमित्ताने काहींचे पर्यटन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांना टोला

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. या अनुषंगाने नाशिकमध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची संयुक्त सभा पार पडली होती. या सभेत बोलताना त्यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. या टीकेला मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी (दि. ११) येथे जाहीर सभेत प्रत्युत्तर देत निवडणुकीच्या निमित्ताने पर्यटन करणारे हे लोक आहेत, असा टोला लगावला.



या सभेला मंत्री गिरीश महाजन, पंकजा मुंडे, माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, राहुल ढिकले, राहुल अहेर, विजय चौधरी, सुनील केदार, बबनराव घोलप, बाळासाहेब सानप, अपूर्व हिरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिकच्या भूमीत प्रभू रामाला वंदन करतो. काल परवा दोन भाऊ येऊन गेले. नाशिकमध्ये आले, पण त्यांना रामाची आठवणच झाली नाही. नाशिकमध्ये येऊन ज्यांनी राम मांडला नाही आता त्यांच्यामध्ये राम उरला नाही. 'और जो राम का नही वो किसी काम का नही'. अलीकडच्या काळात देव खरंच आहेत की नाही? असा प्रश्न काही लोकांना पडायला लागला. देवाची खिल्ली काही लोक उडवायला लागले. त्यांच्याबद्दल मी फार बोलणार नाही, पण मी एवढेच सांगू शकतो या नाशिकमध्ये खऱ्या अर्थाने जो काही विकास झाला आणि होणार आहे त्याची क्षमता कुणामध्ये असेल तर ती भाजपमध्ये आहे.

माझी खिल्ली उडवली गेली. म्हणाले नाशिक दत्तक घेतले होते, त्याचे काय झाले? हो, मी सांगितले होते मी नाशिक दत्तक घेतोय. मी त्यानंतर ही तक्रार नाही केली, की मी २०१७ साली नाशिक दत्तक घेतले आणि २०१९ साली विरोधी पक्षाचा नेता झालो. दोनच वर्ष मला मिळाली, पण याची तक्रार मी केली नाही, कारण तक्रार करणारे लोक आम्ही नाहीत. विरोधी पक्ष नेता म्हणूनदेखील जेव्हा कोविडच्या काळात उबाठा, मनसे, काँग्रेस, राष्ट्रवादीचे नेते घरी बसले होते, तेव्हा हा देवाभाऊ नाशिकमध्ये आला होता. या ठिकाणच्या प्रत्येक कोविड केअर सेंटर आणि आयसीयूपर्यंत जाणारा हा देवाभाऊ होता, पण मला त्यांना विचारायचे आहे, तुम्ही किती वेळा नाशिकला आले? मी तर वर्षातून चारदा नाशिकला येतो, पण तुम्ही किती वेळा आलात? (पान २ वर..)

## आता मुंबई १० मिनिटांत बंद पाडण्याचा त्यांच्यामध्ये दम नाही!

**मुंबई :** शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी एका मुलाखतीत बोलताना आम्ही आजही मुंबई १० मिनिटांत बंद पाडू शकतो, असे विधान केले होते. त्यांच्या या वक्तव्यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता मुंबई १० मिनिटांत बंद पाडण्याचा यांच्या कोणात दम नाही', असे म्हणत राऊत यांच्या वक्तव्यावर जोरदार टीका केली. ते एका कार्यक्रमात बोलत होते.

**मुख्यमंत्र्यांनी राऊतांना सुनावले**

खासदार राऊत यांच्या वक्तव्याबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आम्ही अशा पोकळ धमक्यांना घाबरणारे लोक नाहीत हे लक्षात घ्या. जर तुमची (उद्धव ठाकरे यांची) ताकद एवढीच होती तर तुम्हीच आव्हान दिले होते की, जेव्हा एकनाथ शिंदे गुवाहाटीला गेले होते, ते मुंबईत येतील तेव्हा त्यांना मुंबईत एन्ट्री करू देणार नाहीत, शिंदे मुंबईत पाऊल ठेवू शकणार नाहीत. मुंबईत ते पुढे जाऊ शकणार नाहीत, मात्र तरीही शिंदे मुंबईत आले, ५० आमदारांबरोबर आले, याच मुंबईच्या रस्त्यांवरून शिंदे आणि आम्ही राजभवनात गेलो. त्यानंतर आम्ही सरकार स्थापन केले, अशी आठवण मुख्यमंत्री फडणवीस यांनी करून दिली.

मुंबई बंद करणे तर सोडा, ते (संजय राऊत) त्यांच्या घराभोवतीचा परिसरही बंद करू शकले नाहीत. त्यामुळे या सगळ्या फक्त बोलायच्या गोष्टी आहेत. जेव्हा बाळासाहेब ठाकरे होते, तेव्हा शिवसेनेची ताकद होती. बाळासाहेबांच्या एका इशाऱ्यावर दोन तासात मुंबई बंद होऊ शकत होती, मात्र आता यांच्या कोणात दम नाही. संजय राऊत दिवसभर अशा पद्धतीचे फक्त बोलत असतात, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.



## पनवेल महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात आम्ही विकासकामे केली


### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन | नावडे ते तोंडरे भव्य रॅली आणि सभा

**नावडे : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाने कोणत्याही प्रकारचा पक्षपातीपणा न करता पनवेल महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात विकासकामे करून दाखवली आहेत. 'सबका साथ सबका विकास' हा मंत्र घेऊन शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल विकास साधला असून विकासाचा हा वेग कायम राखण्यासाठी येत्या १५ तारखेला महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि. १०) प्रभाग २मध्ये भव्य बाईक रॅली काढण्यात आली होती. नावडे कॉलनीपासून सुरू झालेली ही रॅली नावडे गाव, पेंधर, नागझरी, ढोंगऱ्याचापाडा, पाटीलवाडी, देवीचापाडा, पाले खुर्दमार्गे जात तोंडरे येथे गेली.





या रॅलीच्या माध्यमातून महायुतीने शक्तिप्रदर्शन करत विजयाचा निर्धार व्यक्त केला.

या रॅलीत महायुतीच्या उमेदवार काजल महेश पाटील, अरुणा किरण दाभणे, दिनेश रवींद्र खानावकर आणि कृष्णा पाटील यांनी सहभागी होऊन मतदारांशी संवाद साधला. रॅलीमध्ये उत्तर भारतीय मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष शैलेश मिश्रा, सचिव अ‍ॅड. इंदू दुबे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, संतोष शर्मा, नारायणशेठ पाटील, वासुदेव पाटील, एकनाथ देशेकर, अशोक साळुंखे, काळुराम फडके, प्रकाश खैरे, बाळाराम पाटील, शुभ पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीच्या सांगता सभेत बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजपच्या विकासकामांचा आढावा घेतला. देशाप्रती प्रेम असलेला माणूस कशा पद्धतीने काम करू शकतो, याचे जिवंत उदाहरण पंतप्रधान नरेंद्र मोदी असल्याचे सांगत त्यांनी नेतृत्वाचे कौतुक केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सर्व घटकांसाठी योजना राबवून नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

## निवडक

### जम्मूत दहशतवाद्यांनी लपवलेला सॅटेलाईट डिव्हाइस सापडला

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या कारवाया खोडून काढण्यासाठी भारतीय लष्कर, सीमा सुरक्षा दल आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या विशेष ऑपरेशन ग्रुपने राबवलेल्या संयुक्त मोहिमेला मोठे यश मिळाले. दहशतवाद्यांनी लपवून ठेवलेले एक सक्रिय सॅटेलाईट कम्युनिकेशन डिव्हाइस शोधमोहिमेदरम्यान सापडले आहे. यामुळे सीमापार बसलेल्या देशविरोधी कारवाया करणाऱ्या गटांशी संपर्क साधण्याचे दहशतवाद्यांचे प्रयत्न उधळले गेले आहेत.

### न्यूझीलंडविरुद्ध टीम इंडियाची विजयी सलामी; विराटची फिफ्टी

**वडोदरा :** न्यूझीलंडविरुद्धचा पहिला एकदिवसीय सामना भारतीय संघाने चार गडी राखून जिंकला. 'किवीं'नी ३०० धावा केल्या होत्या. हे आव्हान भारताने विराट कोहलीच्या अर्धशतकाच्या (९३ धावा) जोरावर पार केले.

## सोमनाथ स्वाभिमान पर्वात पंतप्रधान मोदींचा सहभाग



**सोमनाथ : वृत्तसंस्था**

सोमनाथचा इतिहास हा विजय आणि पुनर्निर्माणाचा तसेच आपल्या पूर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ते रविवारी (दि. ११) गुजरातमधील सोमनाथ येथे सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

विदेशी आक्रमकांनी सोमनाथ आणि भारताला नष्ट करायचा अनेकदा प्रयत्न करूनही सोमनाथ आणि भारत नष्ट झाले नाहीत. आपल्या पूर्वजांनी प्राणाचे बलिदान देऊन त्यांचे रक्षण केले, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

सोमनाथ स्वाभिमान पर्वाचा भाग म्हणून भव्य शौर्ययात्रा निघाली होती. गुजरातच्या विविध भागातून आलेले १०८ अश्व आणि डमरू वादक पथक या यात्रेत सहभागी झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फुलांनी सजवलेल्या वाहनावर आरूढ होत यात्रेचे नेतृत्व. या वेळी पंतप्रधानांनी काही वेळ ढोल वादनही केले. रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या भाविकांनी यात्रेवर पुष्पवर्षाव केला आणि हर हर महादेवचा जयघोष केला.

## रविवार ठरला प्रचारवार; प्रभाग १९मध्ये महायुतीचा झंझावात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत रविवार (दि. ११) हा प्रचारवार ठरला. माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग १९मधील कल्पतरू सोसायटी आणि लगतच्या परिसरात महायुतीची प्रचार रॅली आयोजित करण्यात आली होती. या माध्यमातून उमेदवारांनी मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या.

प्रभाग क्रमांक १९मध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय महायुतीने प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या प्रभागात झालेल्या विकासकामांच्या जोरावर मतदारांकडून महायुतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. या प्रभागातील चार उमेदवारांपैकी महायुतीच्या उमेदवार दर्शना भोईर आणि रूचिता लोंढे बिनविरोध विजयी झाल्या असून आता राजू सोनी आणि सुमित



झुंझारराव निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांच्या प्रचारार्थ रविवारी रॅली काढण्यात आली होती.

या रॅलीत भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, अर्चना ठाकूर, प्रमोद ठाकूर, उल्हास झुंजारराव, पूनम ठाकूर, नितीन जोशी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने प्रचारात सहभागी झाले होते.

प्रभाग १९मधील विकासाचा वेग कायम राखण्यासाठी राजू सोनी आणि सुमित झुंझारराव यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

## प्रिय आई-बाबा मतदान करा!

### पनवेल मनपाची पाल्यांमार्फत पालकांना साद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता 'स्विप'च्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने पाल्यांमार्फत त्यांच्या पालकांना मतदान करण्यासाठी साद घातली जाणार आहे.



पालकांनी निवडणुकीत मतदान करण्याबाबत विनंती करण्याचा संदेश असलेले पत्र विद्यार्थ्यांकडे देण्यात येत असून त्यांनी आपल्या पालकांकडून मतदान करण्याचे आश्वासन घ्यावयाचे आहे. पनवेल महापालिका हद्दीतील मनपा व इतर महत्त्वाच्या शाळांमधून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून उपरोक्त पत्र देण्याचा हा उपक्रम आहे.

अशा प्रकारचा संदेश जवळपास ७५ शाळांमधून एका लाख विद्यार्थीवर्गाच्या मार्फत पालकांपर्यंत पनवेल महापालिका पाठवत आहे.

हा संदेश विद्यार्थी आपल्या घरी जाऊन आपल्या आई-वडिलांना देतील आणि त्यांच्याकडून मतदान करणारच अशी हमी घेतील. या उपक्रमाद्वारे मतदान जनजागृती होऊन मतदान टक्केवारी वाढेल, असा विश्वास निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी व्यक्त केला आहे.

पनवेल महापालिका हद्दीतील पात्र मतदारांनी येत्या गुरुवारी, १५ जानेवारीला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आपला मतदानाचा हक्क बजावून लोकशाही अधिक बळकट करण्यास मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### इतर उपक्रमांतूनही जनजागृती

या अभिनव उपक्रमासोबतच महापालिकेमार्फत अन्यही विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यात प्रामुख्याने विविध महत्त्वाच्या चौकांमधून मतदानविषयक जनजागृती करण्याचे थ्रीडी पुतळे, पारंपरिक लोक कलावंत, पथनाट्य, वासुदेव, पोवाडा; त्यासोबतच विविध शाळा महाविद्यालयांमधून मतदानविषयक निबंध व पोस्टर स्पर्धा, मॅरेथॉन, सायकल रॅली, मानवी साखळी अशा प्रकारच्या उपक्रमांचा समावेश असल्याचे स्विपचे नोडल अधिकारी तथा उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले.

## पाच वर्षांसाठी पाणीपट्टी वाढीला स्थगिती ते लाडक्या बहिणींना बेस्टमध्ये ५० टक्के सवलत

### मुंबईकरांसाठी महायुतीचा वचननामा; अनेक घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना, रिपाइं महायुतीने रविवारी (दि. ११) आपला वचननामा अर्थात जाहीरनामा प्रसिद्ध केला. यामध्ये पाच वर्षांसाठी पाणीपट्टी वाढ स्थगित करणे, बेस्टमध्ये महिलांना ५० टक्के सवलत देणे, लाडक्या बहिणींना लघु उद्योगासाठी पाच लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, झोपडपट्टीमुक्त मुंबई, २० ते ३५ लाख घरांची निर्मिती करणे, रोहिंग्या आणि बांगलादेशीमुक्त मुंबई करणे तसेच धारावीचा विकास आदी अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी मुंबईसाठीचा आपला वचननामा प्रसिद्ध केला. विशेष म्हणजे दोन लाख नागरिकांच्या सूचना लक्षात घेऊन हा वचननामा तयार करण्यात आला आहे.



या वेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इतर कुणीही वचननामा दिला तरीही त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड आणि आमचा ट्रॅक रेकॉर्ड मोठा असेल. पुढील पाच वर्षानंतर आम्ही काय-काय केले याचा एक रिपोर्ट जनतेसमोर मांडू. काही ठिकाणी उंचीची अडचण निर्माण होत आहे. याच्यावर काम करत आहोत. रडार सिस्टीम ठिकाण बदलता येईल का यासाठी प्रयत्न करत आहोत. मुंबईकरांना मुंबईबाहेर जाऊ देणार नाही. काही लोक बोलत राहिले आम्ही मात्र करून दाखवले. बीडीडी, अभ्युदय नगर, विशाल सह्याद्री नगर याचे उदाहरण आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले, आजचा हा वचननामा मुंबईकरांच्या दररोजच्या जीवनात बदल घडवणारा ठरेल. मुंबई हा या देशाचा प्राण, ग्रोथ इंजिन आहे. या मुंबईला पुढच्या पाच वर्षांत जागतिक दर्जाचे शहर करण्याचे वचन आम्ही देत आहोत. केंद्रात आणि राज्यात महायुतीचेच सरकार आहे. आता १६ तारखेला महायुतीचा भगवा महापालिकेवर फडकेल. मुंबईच्या विकासासाठी जे करायचे आहे ते आम्ही या वचननाम्यात सांगितले आहे. मुंबईच्या विकासाचा वेग आणखी वाढवायचा आहे. मुंबईत असलेल्या मराठी माणसाचे रक्षण करणे, संस्कृती जतन करणे आमची जबाबदारी आणि वचन आहे.

# मुंबईचा थांबलेला विकास पुन्हा सुरू

## जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचा महायुतीचा निर्धार

**मुंबई : प्रतिनिधी**

विकास हाच आमचा केंद्रबिंदू असून मुंबईचा रखडलेला विकास पुन्हा वेगाने सुरू करण्यात आला आहे. घरकुल योजना, क्लस्टर डेव्हलपमेंट, खड्डेमुक्त काँक्रीट रस्ते आणि सर्वसामान्यांच्या हिताच्या योजनांच्या माध्यमातून मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचा निर्धार महायुती सरकारने केला आहे, असे ठाम प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.




याचवेळी त्यांनी शिवसेना, भाजप आणि रिपाईच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करून महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकवा, असे आवाहन मतदारांना केले. मुंबई महापालिका व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वांद्रे, वांद्रे पूर्व, विलेपार्ले आणि अंधेरी मतदारसंघातील प्रचार दौऱ्यात ते बोलत होते. येथील प्रचार दौऱ्यांना मतदारांचा प्रचंड उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

प्रचारा दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, कोणीही माईचा लाल आला तरी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. या योजनेमुळे बहिणी स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि लखपती बनलेलं पाहणं हेच आमचं अंतिम ध्येय आहे.

युतीधर्म पाळत उमेदवारी मागे घेतलेल्या आणि महायुतीला पाठिंबा दिलेल्या नेत्यांचे शिंदे यांनी विशेष कौतुक केले. काँग्रेस आणि उबाठावर टीका करताना ते म्हणाले, मी मुख्यमंत्री असताना लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेला काँग्रेससह उबाठाने विरोध केला, कोर्टात गेले आणि अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. मात्र आम्ही लाडक्या बहिणींसाठी ठामपणे उभे राहिलो आहोत.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना सतर्क राहण्याचे आवाहन करत शिंदे म्हणाले, १५ तारखेपर्यंत गाफील राहू नका. प्रत्येक मत महत्त्वाचं आहे. महायुतीच्या विजयासाठी सर्वांनी एकजुटीने, ताकदीने काम करा. शेवटी त्यांनी मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानत, तुमच्या प्रेमळ आशीर्वादामुळेच आम्ही हा संघर्ष उभा करू शकलो. तुमचे योगदान कायम लक्षात ठेवले जाईल, असे भावनिक उद्गार काढले. यानंतर अंधेरी मतदारसंघातील प्रचार दौऱ्यात शिंदे यांनी क्लस्टर डेव्हलपमेंटचा मुद्दा उपस्थित करत सर्वसामान्य मुंबईकरांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. गिरणी कामगारांना घरे देण्यात आली असून ही प्रक्रिया आजही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत मोठ्या प्रमाणावर काँक्रीट रस्त्यांची निर्मिती होत असून त्यामुळे शहर खड्डेमुक्त होईल. थांबलेले प्रकल्प पुन्हा सुरू करण्यात आले असून मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याच्या दिशेने महायुती सरकार ठामपणे वाटचाल करीत विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.यावेळी माजी मंत्री दीपक सावंत, आमदार मुरजी पटेल, आमदार भावना गवळी उपस्थित होते.

## माजी मुरूड पं.स. सभापती रमेश उर्फ बाबू नागावकर समर्थकांसह शिवसेनेत



**रेवदंडा : प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर विरोधक म्हणून जि.प.गटातून निवडणुक लढविण्याचे तयारी असलेले माजी मुरूड पंचायत समिती सभापती रमेश उर्फ बाबू नागांवकर यांना शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश दिला, व त्यांच्या पत्नी ज्योती नांगावकर यांना जिल्हा परिषद निवडणूकीची उमेदवारी जाहीर करून शिवसेनेचे कोर्लई जिल्हा परिषद गटात धमाका उडवून दिला आहे.

उसरोली जिल्हा परिषद गटाचे नामकरण कोर्लई जिल्हा परिषद करण्यात आले असून आगामी जिल्हा परिषद निवडणूक पदाधिकारी व कार्यकर्ते यांचेशी संवाद साधण्यासाठी व जिल्हा परिषदेचा उमेदवार निश्चितीसाठी बोर्ली येथे शुक्रवार दि. ९ जानेवारी रोजी आढावा बैठक तसेच माजी मुरूड पं.स.सभापती रमेश उर्फ बाबू नागावकर व समर्थक तसेच भोईघर ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य,सदस्या ग्रामस्थ यांच्या भव्य पक्षप्रवेश सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

या वेळी आमदार महेंद दळवी यांनी मार्गदर्शनात माजी पं.स.सभापती रमेश नागावकर यांचे शिवसेना पक्षात जाहीर स्वागत केले, व शिवसेनेत मानाचे स्थान दिले जाईल अशी ग्वाही दिली, तसेच यावेळी आमदार महेंद्र दळवी यांनी कोर्लई जि.प.गटासाठी रमेश नागावकर यांची धर्मपत्नी ज्योती नागावकर यांना कोर्लई जिल्हा परिषदेसाठी उमेदवारी जाहीर केली. शिवसेनेत पक्ष प्रवेश केलेले रमेश नागावकर यांनी शेकापक्षाचे माजी मुरूड पं.स.सभापती आहेत, नुकताच त्यांनी शेकापक्षाला सोडचिट्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता, परंतू अल्पावधीत त्यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवीत शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश घेतला,

या पक्षप्रवेशाने भोईघर ग्रामपंचायतीत शिवसेनेचे मताधिक्यात वाढ होणार असून कोर्लई जिल्हा परिषदेत शिवसेनेचे प्रबल उमेदवार ज्योती नागावकर यांचे रूपाने मिळाला आहे.

## तळा बसस्थानकातील छताचे पीओपी कोसळले; एक जखमी




**तळा : प्रतिनिधी**

तळा बसस्थानकातील पिओपी शुक्रवारी संध्याकाळच्या दरम्यान अचानक कोसळुन एक प्रवासी किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली आहे.तळा बसस्थानकाच्या दुरुस्तीच्या कामासाठी दहा लक्ष रुपये मंजूर करण्यात येऊन या कामाचे भूमिपूजन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ऑनलाइन पध्दतीने करण्यात आले होते.

फेब्रुवारी २०२४ मध्ये तळा बसस्थानक दुरुस्तीचे काम करण्यात येऊन अवघ्या दोन वर्षातच सदर बसस्थानकाची पिओपी कोसळल्याने कामाच्या दर्जाबाबत विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत व प्रवासी ,नागरिकांतून संताप व्यक्त करून नाराजी व्यक्त केली जात आहे. संपूर्ण तालुक्याचं बसस्थानक कसे असावे,बसण्याची व्यवस्था कशी असावी याचे योग्य नियोजन संबंधित ठेकेदाराकडूनकेले गेले नसूनदहा लक्ष रुपयां ऐवजी पाच लक्ष रुपयेच खर्च झालेले असावेत अशी चर्चा होताना दिसत आहे.नवीन वर्षांपासून सुरू झालेल्या बसस्थानकाच्या कामामुळे प्रवासी वाढतील बाजारपेठेत वर्दळ वाढेल व्यवसायाला चालना मिळेल अशी अपेक्षा केली जात होती.

## जनता विद्यामंदिरामध्ये विविध स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

श्री स्वामी विवेकानंद शैक्षणिक संस्था संचलित जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर आजिवली तालुका पनवेल जिल्हा रायगड येथे राष्ट्रीय सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते सदर स्पर्धेमध्ये ५० ते ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अतिशय उत्तम चित्रकला व रांगोळी स्पर्धेतचे मुलांनी प्रदर्शन केले. निरीक्षक वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनवेल वाहतूक शाखा प्रकाश सपकाळ, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत पवार, पोलीस हवालदार संजय गावडे, ज्ञानेश्वर वाघ, पोलीस योगेश जाधव व चालक श्रेयस जाधव उपस्थित होते.



## यशवंती हायकर्सतर्फे बोरघाटात स्वच्छतेचा जागर

**खोपोली : प्रतिनिधी**

निसर्ग हाच खरा देव आणि त्याची सेवा हीच खरी भक्ती, हे ब्रीद उराशी बाळगून 'यशवंती हायकर्स' आणि खोपोली नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्रीच्या डोंगररांगांमधील 'बोरघाट' परिसरात स्वच्छतेची मंगल गंगा अवतरली. रविवार, ११ जानेवारी २०२६ रोजी या अभियानाचा 'चौथा सुवर्ण टप्पा' मोठ्या उत्साहात आणि संकल्पपूर्तीने संपन्न झाला.



स्वच्छतेच्या या महायज्ञात खोपोलीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष कुलदीप शेंडे आणि नवनिर्वाचित नगरसेवक किशोर पाटील, नवनिर्वाचित नगरसेवक राहुल गायकवाड यांनी केवळ उपस्थितीच लावली नाही, तर प्रत्यक्ष श्रमदानातून समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण केला. विशेष आनंदाची बाब म्हणजे, 'यशवंती'चे उपाध्यक्ष, ज्यांनी नुकताच नगरसेवक पदावर प्रचंड बहुमताने विजयाचा गुलाल उधळला आहे, त्यांनी आपल्या पदाची प्रतिष्ठा जनसेवेच्या या कार्यात अर्पण करत सक्रिय सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी यशवंतीच्या अध्यक्षांनी मान्यवरांचे स्वागत प्रेमाचे प्रतीक असलेल्या गुलाबपुष्पाने केले. ज्येष्ठ मार्गदर्शक पद्माकर गायकवाड सर यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून 'निसर्ग संवर्धन' ही काळाची गरज कशी आहे, यावर प्रकाश टाकला. त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थित स्वयंसेवकांमध्ये नवा उत्साह संचारला.

बोरघाटामधील कचऱ्याचे साम्राज्य हटवण्यासाठी मच्छिंद्र यादव (अध्यक्ष), संदीप पाटील (उपाध्यक्ष), प्रणित गावंड (सहसचिव) यांच्यासह ज्येष्ठ सदस्य सदाशिव पाटील, कैलास मोरे, निशिकांत पाटील, सगळगिळे सर, प्रकाश गायकवाड आणि युवा शक्तीतील अभिजित देशमुख, अजय फाळे, वसंत वाडकर, सचिन पवार, मयुरेश उंबरे राहुल कोरडे, कुमार कौशिक पवार, कुमार रुद्र पवार, कुमार मंथन बेलोसे या 'निसर्गपुत्रांनी' अथक परिश्रम घेतले.

**नगराध्यक्षांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेला हा चौथा टप्पा म्हणजे केवळ स्वच्छता अभियान नसून खोपोलीचा मानबिंदू असलेल्या बोरघाटाला लागलेले प्लास्टिकचे ग्रहण सोडवण्यासाठी दिलेला एक सामूहिक लढा होता. निसर्गाच्या या पवित्र कार्यात 'यशवंती'चा हा जागर असाच अविरत सुरू राहील हाच विश्वास आजच्या यशस्वी टप्प्याने दिला आहे.**

**–महेंद्र भंडारे, अध्यक्ष, यशवंती हॅकर्स खोपोली**

## फ्लॅश मॉबच्या माध्यमातून संगीतमय मतदान जागृती उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ करिता 'मतदारांचे सुनियोजित शिक्षण आणि निवडणूक सहभाग कार्यक्रमांतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून सर्वत्र व्यापक प्रमाणात मतदान जनजागृती करण्यात येत आहे. स्वीप उपक्रमांचे नोडल अधिकारी उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या माध्यमातून अनोखे उपक्रम राबविले जात आहेत.



शनिवारी संध्याकाळी तसेच रविवारी सुट्टीच्या दिवशी नागरिक कुटुंबियांसमवेत मोठ्या संख्येने फिरायला बाहेर पडतात किंवा मॉलमध्ये खरेदीसाठी जातात हे लक्षात घेत वर्दळीच्या ठिकाणी करण्यात येत असलेल्या पथनाट्यांप्रमाणेच मॉल्समध्ये फ्लॅश मॉबसारख्या आधुनिक संगीतमय नृत्य प्रकारचाही प्रभावीपणे उपयोग करण्यात येत आहे.

यामध्ये सीवूड येथील नेक्सस मॉल फ्लॅश मॉबचे आयोजन करण्यात आले होते. मॉलमध्ये नेहमीचे गर्दीचे वातावरण व नागरिकांमध्ये खरेदीची लगबग सुरू असताना अचानक आकर्षित करून घेणारे संगीत वाजायला लागते. हा गाण्यांचा आवाज कुठून येतोय हे बघण्यासाठी लोक त्या दिशेला वळतात, तो त्यांना मॉलच्या मध्यभागी ८० हून अधिक युवक–युवतींचा समूह १५ जानेवारीला मतदान करा असे आवाहन करणारे फलक उंचावत नृत्य करताना दिसतो. बघता बघता नृत्य पाहण्यासाठी भोवताली गर्दी जमू लागते. जणू मॉलमधले सर्वच नागरिक वेगवेगळया मजल्यांवरून ग्रीलच्या कठड्याजवळ येऊन खालच्या पॅसेजमधल्या नृत्याविष्काराला दाद देऊ लागतात. विशेषत्वाने तरूणाईचे कॅमेरे हा संगीतमय थरार रिल्समध्ये टिपण्यासाठी कॅमेरा धरून चित्रीकरण करतात.

आरंभ क्रिएशन्सचा ८० कलावंतांचा नृत्यसमुह लोकप्रिय गाण्यांच्या माध्यमातून १५ जानेवारीला नवी मुंबई महानगरपालिका निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन करतो. त्याला नागरिकांचा उदंड उत्साही प्रतिसाद लाभतो. यामध्ये आणखी एक विशेष बाब म्हणजे मतदान यंत्राचे मॅस्कॉट (शुभंकर) तयार करण्यात आला आहे. या मतदान यंत्ररूपी मॅस्कॉटसोबत अनेकांनी हौसेने सेल्फी छायाचित्रे काढली. अशाच प्रकारचा फ्लॅश मॉब उपक्रम रविवारी सुट्टीच्या दिवशी ११ जानेवारी रोजी इनॉर्बिट मॉल वाशी येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

अशा विविध माध्यमांतून कलात्मक रितीने नवी मुंबई महानगरपालिका निवडणूकीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत असून नागरिकांनी १५ जानेवारी रोजी, सकाळी ७.३० ते सायं. ५.३० या वेळेत मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन करण्यात येत आहे.

पान १ वरुन

## निवडणुकीच्या निमित्ताने काहींचे पर्यटन

निवडणुका आल्या की नाशिकला यायचे आणि निवडणुका संपल्या की, नाशिकला विसरायचे अशा पद्धतीचे हे निवडणूक पर्यटक आहेत. निवडणुकीच्या निमित्ताने पर्यटन करणारे हे लोक आहेत, असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

काळजी करू नका, खऱ्या अर्थाने नाशिकशी माझे नाते तेच आहे. कालही होते, आजही आहे आणि उद्याही राहिल, कारण नाशिकची जबाबदारी आम्ही घेतली आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.



**मुरुड : ऑस्ट्रेलिया देशातून येणारे सी–गल पक्ष्यांची संख्या मुरुड समुद्र किनारी मोठ्या संख्येनने वाढली आहे, कारण यंदा थंडीचा जोर वाढल्याने या पक्षांना अनुकूल असे वातावरण लाभल्याने समुद्र किनारी शेकडोच्या संख्येने त्यांना वास्तव्य केल्याचे दिसून येत आहे. या पक्ष्यांचा संजय करडे यांनी टिपलेला थवा.**

## पोलीस वर्धापन दिनानिमित्त चिखले येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस वर्धापन दिनाचे औचित्य साधून रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने श्री प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिखले तालुका पनवेल येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.




पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिखले यथील विद्यार्थ्यंना तालुका पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे आणून पोलीस ठाणे कडील हत्यार, पोलिसांचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज याची माहिती दिलेली आहे. तसेच सायबर गुन्हे, नशा मुक्ती संदर्भात योग्य ते मार्गदर्शन करून, अंमली पदार्थाचे सेवन व त्यापासून होणारे दुष्परिणाम, वाहतुकीचे नियम, याबाबत अवगत केले.

सायबर हेल्पलाइन नंबर १९३० व तत्काळ पोलीस मदतीकरिता डायल ११२, या संदर्भात माहिती दिली तसेच लहान मुलांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सूचना दिल्या यावेळी शाळेचे तीन शिक्षक व ५० विद्यार्थी तसेच हद्दीतील ३५ नागरिक उपस्थित होते.

## दुखवटा

### परशुराम भगत

**धाटाव :** रोहा तालुक्यातील बोरगाव येथील कुणबी समाजाचे ज्येष्ठ नेते, मार्गदर्शक व दानशूर व्यक्तिमत्त्व परशुराम अंबाजी भगत ऊर्फ बुवा यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७७ वर्षे होते. त्यांच्या अंत्ययात्रेत राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर पाटील, विजय राव मोरे, कुणबी समाज रोहा तालुका अध्यक्ष सुरेशजी मगर, रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष विनोद भाऊ पाशिलकर, वरसे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अमित मोहिते, यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.



## निवडक

### घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** शहरातील एका बंद घरात अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. प्रमोद जोरी यांच्या सचिन प्लाझा बिल्डिंगमधील बंद घरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून जवळपास आठ लाख १३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अपघातात एक ठार, दुसरा जखमी

**पनवेल :** शिरढोण गाव साईकृपा हॉटेलसमोर एका डंपरची धडक मोटारसायकलीस बसल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकवरील एका इसमाचा गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला आहे. तर त्याचा सहकारी जखमी झाला आहे. शिरढोण गाव साईकृपा हॉटेल समोर मुंबई – गोवा महामार्गावरील गोवा लेनवरून जाणाऱ्या डंपरची मोटारसायकलीस धडक बसल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकवरील अतुलकुमार शिवकुमार (वय २६, रा. रबाळे) हा गंभीररित्या जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला आहे. तर त्याचा सहकारी शुभम सरफणे (वय २८, रा. कल्याण) हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**पनवेल :** ४१ वर्षीय महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी मंगेश विश्वनाथ नेने (रा. नेणेपाडा, पेण) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ४१ वर्षीय महिला नवी मुंबईमध्ये राहत असून मंगेश नेने यांनी तिला लग्न करण्याचे आमिष दाखवले आणि नवी मुंबईतील विविध ठिकाणी येऊन शरीर संबंध प्रस्थापित केले आणि लग्नाचा खोटा बनाव करून फसवणूक केली.

# खोपटा रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटीकरणाला सुरुवात



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील उरण पुर्व विभागातील गावांना जोडणाऱ्या खोपटा या महत्वाच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या रस्त्याचा शुभारंभ यशस्वी उद्योजक पी.पी. खार पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

रस्त्यावरील दोन किलोमीटर लांबीचा रस्ता रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्यासाठी सुमारे सात कोटींचा निधी सार्वजनिक बांधकाम खात्याने मंजूर केला आहे. उरणच्या सर्वांगीण विकासासाठी उरणचे आमदार महेश बालदी हे पुढाकार घेत असल्याने या वेळी प्रवाशी नागरीकांनी त्यांचे आभार मानले.

उरण, द्रोणागिरी शहर व जेएनपीए बंदर यांना उरण पुर्व विभागातील गावांना जोडणारा खोपटा पुल ते कोप्रोली हा महत्त्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वर्दळ असल्याने या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था होऊन सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असे. त्यामुळे सदर रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली. उरणचे आमदार महेश बालदी यांनी यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे खोपटा रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याला खोपटा रस्त्याच्या कामासाठी सुमारे सात कोटींचा निधी २०२५-२६ मध्ये उपलब्ध करून देण्याचे काम केले. मे.पी. पी.खारपाटील कन्स्ट्रक्शन कंपनीने नव्या वर्षाच्या शुभारंभ प्रसंगी खोपटा या रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ शुक्रवारी (दि.९) यशस्वी उद्योजक पी.पी.खारपाटील व महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवि भोईर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी राजा खारपाटील, महिला अध्यक्षा राणी म्हात्रे, भाजपचे तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, उरण पुर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, बांधपाडा सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, उद्योजक देवेंद्र पाटील, सुनील पाटील उद्योजक समीर खारपाटील, सारडे सरपंच रोशन पाटील, भाजपचे तालुका सरचिटणीस मुकूंद गावंड, युवा नेते सुशांत पाटील सह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रवाशी, नागरीक उपस्थित होते.

## अमली पदार्थाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील स्टील मार्केट परिसरात अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना कळंबोली पोलिसांनी सापळा रचून अटक केली. राजेश शर्मा (वय २६) आणि योगेश पवार (वय २५) अशी या दोघांची नावे असून, या दोघांच्या ताब्यातून ५ किलो ८२ ग्रॅम वजनाचा दोन लाख ५४ हजार रुपये किमतीचा गांजा साठा जप्त केला आहे. या प्रकरणात सहभागी असलेल्या त्यांच्या तिसऱ्या साथीदाराचा शोध पोलीस घेत आहेत.

कळंबोलीतील स्टील मार्केट परिसरामध्ये दोन व्यक्ती अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती कळंबोली पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वपोनि. राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. आयाज पटेल, सपोनि. नितीन शिंदे, पीएसआय. अमोल चौगुले व त्यांच्या पथकाने कळंबोली स्टील मार्केट परिसरात सापळा लावला होता. या वेळी राजेश शर्मा व योगेश पवार हे दोघे त्या भागात संशयास्पदरीत्या आले असता, दबा धरून बसलेल्या पोलिसांनी दोघांची धरपकड केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडे असलेल्या बॅगेची झडती घेतली असता, त्यात पाच किलो ८२ ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला.

पोलिसांनी हा गांजा जप्त करून दोघांची चौकशी केली असता, कळंबोली गावात राहणाऱ्या एका व्यक्तीने खरेदीसाठी हा गांजा मागवल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार कळंबोली पोलिसांनी या तिघांविरोधात गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे.

## ट्रेंडिंगच्या नावाने १४ लाखांची फसवणूक

**पनवेल :** ट्रेंडिंगच्या नावाने १४ लाख दहा हजार रुपये घेऊन रक्कम परत न करता ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात ८ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

६३ वर्षीय जेष्ठ नागरिक तेजेंद्रनाथ गर्ग हे कामोठे येथे राहत असून त्यांना फेसबुकवर एका महिलेची फ्रेंड रिक्वेस्ट आली. ती स्वीकारल्यानंतर शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक कशी करायची यासाठी तिने त्यांना व्हाट्सअप नंबर दिला. यावेळी त्या महिलेने मी जिथे गुंतवणूक करते त्या पमध्ये गुंतवणूक करून बघा, रोज पाच टक्क्यांपर्यंत नफा होईल असा मेसेज केला. लिंक पाठवली असता त्यात अकाउंट उघडले आणि पैसे गुंतवणूक केले. त्यानंतर त्यांनी आणखी पैसे जमा केले.

विड्रॉल करण्यासाठी रिक्वेस्ट पाठवली असता ती रिक्वेस्ट स्वीकारण्यात आली नाही आणि पुन्हा पैसे भरण्यास सांगितले. ॲप मधून रक्कम काढण्याचा प्रयत्न केला मात्र रक्कम काढण्यास परवानगी दिली नाही आणि चौदा लाख दहा हजारांची फसवणूक केली.

## भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात नेत्र तपासणी



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील फंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे आरोग्य केंद्र व प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आणि इनोव्हिजन आय हॉस्पिटल, उलवे यांच्या सहकार्याने द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये एकूण १६० विद्यार्थ्यांची सखोल नेत्र तपासणी करण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी विद्यार्थ्यांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण केली व दृष्टीदोषांचे लवकर निदान होणे कसे गरजेचे आहे हे नमूद करून या या उद्देशाने उपक्रमाचे नियोजन केले असल्याचे सांगितले.

विद्यालयाच्या शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी योग्य नियोजन व व्यवस्थापन केले. विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती अनुपमा काठे यांनी आयोजक व वैद्यकीय पथकाचे स्वागत केले.इनोव्हिजन आय हॉस्पिटलच्या डॉ. अमिषा ठाकूर व तेजश्री कडू यांनी प्रत्येक विद्यार्थ्याची काळजीपूर्वक नेत्र तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. वीर वाजेकर महाविद्यालयाच्या वतीने डॉ. श्रेया पाटील, डॉ. झेलम झेंडे व विशाल देशमुख यांनी या उपक्रमाचे यशस्वी समन्वयक म्हणून कार्य पाहिले.

प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शिबिर यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमाचे शाळा प्रशासन, पालक व उपस्थितांनी कौतुक केले असून विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

## बाबदेवपाडा ते कासवलेपाडा रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील करंजा समुद्रकिनारी बाबदेव पाडा ते कासवलेपाडा या रस्त्यांच्या काँक्रीटीकरण कामांचे भूमिपूजन शनिवार (दि.१०) नगरसेवक तथा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर व करंजा मच्छीमार सोसायटी चेअरमन प्रदीप नाखवा यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड योजनेअंतर्गत ६.३० कोटी निधी मंजूर झाला आहे.

या वेळी उरण नगरसेवक रवी भोईर, प्रसाद भोईर, भाजपा तालुकाध्यक्ष, शहर मंडळ प्रसाद भोईर, करंजा मच्छीमार सोसायटी चेअरमन प्रदीप नाखवा, चाणजे ग्रामपंचायत सदस्य रविंद्र कोळी, चाणजे ग्रामपंचायत सदस्य, कैलास भोईर, करंजा मच्छीमार सोसायटी सदस्य, राजेश नाखवा, यांच्यासह भारत नाखवा, रमेश नाखवा, नारायण नाखवा, विनोद कोळी, ऋषिराज कोळी, संजय नाखवा, मधुकर नाखवा, हरेश म्हात्रे, सिद्धार्थ नाखवा, सागर नाखवा, भगवान नाखवा, नरेश कोळी, कैलास कोळी तसेच स्थानिक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या रस्ते विकास कामांमुळे ग्रामीण व समुद्रकिनारी भागातील दळणवळण अधिक सुलभ होणार असून नागरिकांना सुरक्षित, टिकाऊ व दर्जेदार रस्त्यांची सुविधा उपलब्ध होणार असल्याचे या वेळी मान्यवरांनी सांगितले.



## प्रभाग १२मध्ये भव्य प्रचार रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ मध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय महायुतीच्या उमेदवारांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. शनिवारी महायुतीच्या उमेदवारांनी काढलेल्या भव्य प्रचार रॅलीद्वारे आपल्या शक्तीचे प्रदर्शन करत मतदारांशी थेट संवाद साधला.

या रॅलीमध्ये प्रभाग १२ मधील महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रभाकर कांबळे, विद्या प्रकाश तामखेडे, कुसूम रवींद्र म्हात्रे आणि दिलीप बाळाराम पाटील यांनी सहभाग घेऊन मतदारांना कमळ निशाणी समोरील बटन दाबून विजयी करण्याचे आवाहन केले. या वेळी पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, वर्षा ठाकूर, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, राजेश गायकर, आर.जी. म्हात्रे, सुधाकर पाटील, वनिता पाटील, स्वाती कोळी यांनी उपस्थित राहून उमेदवारांना पाठबळ दिले.

रॅलीदरम्यान महायुतीच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. ठिकठिकाणी मतदारांनी उमेदवारांचे स्वागत केले असून, या रॅलीमुळे प्रभाग १२ मध्ये महायुतीचे वातावरण अधिकच सुदृढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. भाजप आणि मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधण्यावर भर दिला असून, विकासाच्या मुद्द्यावर महायुतीला विजय मिळेल, असा विश्वास या वेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## युईएस कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण :** युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स ण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीमध्ये शुक्रवारी (दि. ९) वार्षिक स्नेहसंमेलन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी महाधिवक्ता - महाराष्ट्र, ज्येष्ठ वकील अ‍ॅड. आशुतोष कुंभकोनी उपस्थित होते. त्यांचा सत्कार यु.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांच्या हस्ते करण्यात आला.

कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता यांनीही पी.पी.टी. द्वारे वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमात परीक्षा व क्रीडा स्पर्धेत अव्वल स्थान प्राप्त करणाऱ्या शाळा व कॉलेजमधील सर्व अभ्यासू व गुणवान विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे नृत्य, कार्यक्रम सादर केले.



## खारघरमध्ये विदर्भ परिवाराचा संवाद कार्यक्रम उत्साहात

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून योगदानाचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथे वास्तव्यास असलेल्या विदर्भातील नागरिकांशी संवाद साधण्यासाठी विदर्भ परिवाराच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खारघर येथील श्री राघवेंद्रस्वामी मठामध्ये हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विदर्भातील बांधवांशी संवाद साधत विदर्भाच्या राजकीय व सामाजिक योगदानाचा गौरव केला. विदर्भाने देशाला केंद्रीयमंत्री नितीन गडकरी आणि राज्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे खंबीर नेतृत्व दिले असून, या नेतृत्वाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले.

या कार्यक्रमाला विदर्भातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या वेळी भाजपचे मंडल उपाध्यक्ष तसेच विदर्भ सेवा सहयोग फाउंडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर खरपुरीया, आपला विदर्भ सामाजिक सांस्कृतिक संस्थेचे कोषाध्यक्ष अनंत शेंदे, अध्यक्ष विजय कोव्हाड, उपाध्यक्ष किशोर हुल्हाने, भाजप ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष राम खरपुरिया आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. पदाधिकारी व विदर्भातील बांधव सहभागी झाले होते.



## प्रभाग ११मध्ये घरोघरी प्रचार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात पोहचली असून सर्वच राजकीय पक्षांनी आपला प्रचार शिगेला नेला आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय या महायुतीच्या उमेदवारांनी प्रभाग क्रमांक ११ मध्ये घरोघरी जाऊन प्रचाराचा धडाका लावला आहे.

शनिवारी महायुतीचे अधिकृत उमेदवार चरणदीप बळदेव सिंग, प्रदीप गजानन भगत आणि नीलम मयूर मोहिते यांनी प्रभागातील विविध सोसायट्यांमधील मतदारांच्या भेटी घेतल्या. या वेळी मतदारांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे महायुतीच्या गोटात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या प्रचार दौऱ्यादरम्यान भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांची मोठी फौज उपस्थित होती. उमेदवारांनी मतदारांशी संवाद साधताना प्रभागाचा सर्वांगीण विकास आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

महायुतीच्या या शक्तीप्रदर्शनात पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, वर्षा ठाकूर, मयूर मोहिते, अमोल सय्यद, स्वाती कोळी, ज्योती रायबोले, ललिता इनकर, पंकज बाबर, पंढरीनाथ साळुंखे, कविता माने, अरुना भगत, सुनील यंगर, सुयोग कारपे, तेजस इनकर, सतीश चाके आणि फातिमा आलम खाला यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

प्रचाराच्या या अंतिम टप्प्यात महायुतीने आपली पूर्ण ताकद झोकून दिली असून, प्रभाग मधील मतदारांचा कल आपल्याच बाजूने असल्याचा विश्वास उमेदवारांनी व्यक्त केला आहे.

## उरण येथे कायदेविषयक शिबिर व रस्ता सुरक्षा सप्ताह

**उरण : वार्ताहर**

उरण येथील कोकण ज्ञानपीठ विद्यालययात कायदेविषयक शिबिर व रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या अनुषंगाने प्रबोधन कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कायदेविषयक माहिती आणि रस्ता वाहतूक नियमांबाबत जागरूकतेचे माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात एम एस काझी, एस पी वानखेडे, श्रीमती जे के आर टंडन दिवाणी न्यायाधीश उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी या वेळी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचा मुख्य विषय कायदेविषयक शिबिर व रस्ता वाहतूक नियम हा होता. या वेळी विद्यार्थ्यांना रस्ता वाहतूक नियमांचे पालन कसे करावे आणि त्या बद्दल कायदेविषयक माहिती असण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या वेळी कार्यक्रमात एकूण १०० ते १५० विद्यार्थी शाळेचे शिक्षक वर्ग व इतर कर्मचारी उपस्थित होते.




## संपादकीय

# विकासाचा वचननामा

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्वाधिक लक्ष वेधून घेणारी आणि राजकीयदृष्ट्या सर्वात महत्त्वाची निवडणूक म्हणजे मुंबई महापालिकेची. आर्थिक सत्ता, प्रशासनिक प्रभाव आणि राजकीय प्रतिष्ठा या तिन्ही बाबी एकाच वेळी पणाला लागल्याने ही निवडणूक केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती राज्याच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली आहे. प्रचार अंतिम टप्प्यात पोहचलेला असताना वचननाम्यांची लढाई अधिकच तीव्र झाली आहे.

**मुंबई ही संधी आणि संघर्ष यांचे अद्वितीय मिश्रण आहे. जगातील सर्वात महागड्या घरांपासून ते आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्ट्यांपर्यंतचा विरोधाभास या शहरात दिसतो. अशा शहराच्या कारभारासाठी केवळ घोषणांची यादी पुरेशी नाही, तर त्यासाठी ठोस धोरण, आर्थिक शिस्त आणि प्रशासकीय कौशल्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या निवडणुकीतील भाजप, शिवसेना, रिपाइं महायुतीचा वचननामा मुंबईकरांसमोर विकासदृष्टी ठेवतो. याआधी जाहीर झालेल्या ठाकरे बंधूंच्या जाहीरनाम्यात महिलांसाठी मासिक आर्थिक सहाय्य, घरगुती कामगारांसाठी भत्ता, ७०० चौरस फुटांपर्यंत घरांसाठी मालमत्ता कर सवलत, बससेवेतील सवलती, आरोग्य सुविधा आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांसाठी विशेष रुग्णालय अशी आश्वासने आहेत. ही भूमिका भावनिक आणि सामाजिक पातळीवर परिणामकारक असली तरी तिच्या आर्थिक शाश्वततेबाबत प्रश्न उपस्थित होतात. दुसरीकडे महायुतीचा वचननामा हा अधिक प्रशासकीय आणि धोरणात्मक स्वरूपाचा आहे. डिजिटल प्रशासन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, म्युनसिपल्टी ऑन युवर मोबाईल संकल्पना, एआय लॅब्स, सार्वजनिक वाहतुकीचा प्रचंड विस्तार, झोपडपट्टीमुक्त मुंबई, २४ तास पाणीपुरवठा, पर्यावरण संवर्धन आणि महिलांसाठी व्याजमुक्त कर्ज योजना या सर्व घोषणा मुंबईला जागतिक शहराच्या दिशेने नेण्याची आकांक्षा व्यक्त करतात. या वचननाम्यातील भाषा ही व्यवस्थापन, कार्यक्षमता आणि दीर्घकालीन विकासावर भर देणारी आहे. मागील अनेक वर्षांचा अनुभव पाहता मुंबई महापालिकेत प्रकल्प मंजूर होतात, पण त्यांची अंमलबजावणी वर्षानुवर्षे रखडते. रस्ते, ड्रेनेज, झोपडपट्टी पुनर्विकास, घरबांधणी, सार्वजनिक वाहतूक, प्रदूषण नियंत्रण या मूलभूत समस्यांवर ठोस तोडगा निघालेला नाही. त्यामुळे कोणत्याही वचननाम्याचे मूल्य त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक म्हणजे केवळ सत्तेची लढाई नाही, तर शहराच्या भविष्यासाठीचा जनमतसंग्रह आहे. पुढील पाच वर्षे मुंबई रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा, पर्यावरण, सामाजिक न्याय आणि प्रशासकीय सुधारणा या सर्व बाबींमध्ये कोणत्या दिशेने जाईल, हे या निवडणुकीतून ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईकरांनी भावनांच्या भरात नव्हे, तर विवेकाच्या कसोटीवर वचननाम्यांचे मूल्यांकन करणे गरजेचे आहे. आश्वासनांचा गाजावाजा महत्त्वाचा नाही, तर त्या आश्वासनांमागील राजकीय इच्छाशक्ती, आर्थिक नियोजन आणि प्रशासकीय क्षमता हाच खरा निर्णायक मुद्दा आहे. मुंबईला आता केवळ स्वप्नांची नव्हे, तर प्रत्यक्षात उतरणाऱ्या विकासदृष्टीची गरज आहे. आणि याच कसोटीवर या निवडणुकीतील प्रत्येक जाहीरनामा तपासला जाणार आहे. केंद्रात आणि राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार आहे. मुंबईला जागतिक दर्जाचे उत्तम शहर घडविण्यासाठी येथेही महायुतीची सत्ता आवश्यक आहे. याच अनुषंगाने महायुतीचा वचननामा वेगळा ठरतो.**

# तरुणांचे स्फूर्तिस्थान स्वामी विवेकानंद



एकोणिसाव्या शतकात बंगालमध्ये नरेंद्रनाथ यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. आई भुवनेश्वरीदेवी. वडील विश्वनाथ दत्त, कलकत्ता उच्च न्यायालयात वकील. दत्त घराणे कायस्थ जातीतील होते. नरेंद्रावर बालवयात आईकडून धार्मिक, तर मोठा झाल्यावर वडिलांकडून आधुनिक बुद्धिवादी विचारसरणीचे संस्कार झाले. मेट्रपॉलिटन इन्स्टिट्यूट, प्रेसिडेन्सी कॉलेज आणि जनरल असेंब्लीज इन्स्टिट्यूशन येथे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण होऊन नरेंद्र १८८४ साली बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाला. महाविद्यालयीन जीवनात जगाचा इतिहास आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान यांचा विशेष अभ्यास झाला. मिल आणि स्पेन्सर यांच्या ग्रंथांचा खोल परिणाम त्याच्या मनावर झाला. बंकिमचंद्र चतर्जींच्या आनंदमठ (१८८२) ह्या कादंबरीमुळे देशभक्तीची भावना त्याच्या मनात निर्माण झाली. त्याच्यावर सर्वांत अधिक परिणाम झाला तो केशवचंद्र सेन आणि शिवनाथ शास्त्री यांच्या ब्राह्मो समाजाचा. त्या समाजाचे रीतसर सदस्यत्व नरेंद्राने स्वीकारले. मूर्तिपूजेला विरोध आणि सामाजिक सुधारणांचे महत्त्व हे विचार तेथून उचलले. नरेंद्राचे आजोबा दुर्गाप्रसाद हे संन्यास घेऊन घरातून निघून गेले होते. नरेंद्राच्या ठायी आरंभापासून संन्यासाची ओढ होती. लहानपणी दारावर येणाऱ्या साधुबैराग्यांना तो काहीही देऊन टाकत असे. पुढे घरात विवाहाचा विषय निघाला, तेव्हा त्याने स्पष्ट नकार दिला. त्याच्या ठायी एक सुप्त आध्यात्मिक प्रवृत्ती होती. रामकृष्ण परमहंस (१८३६–८६) यांच्या भेटीनंतर तिला खरी जाग आली.

१८८४ मध्ये वडिलांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आणि नरेंद्राला तीव्र मानसिक क्लेशांमधून जावे लागले. या कालात नरेंद्र प्रथमच कालीमातेच्या मंदिरात तिच्यासमोर नम्र झाला आणि श्रीरामकृष्णांमुळे अद्वैतसिद्धांताचा प्रत्यय येऊन गेला. यानंतर नरेंद्राचे जीवन संपूर्णपणे पालटून गेले. त्याचे मन आध्यात्मिक साधनेकडे वळले. काशीपूरच्या उद्यानगृहात कर्करोगाने आजारी असलेल्या श्रीरामकृष्णांची सेवा करण्याच्या काळात १८८६ च्या प्रारंभी त्याला निर्विकल्प समाधीचा लाभ झाला. समाधीतच अखंड बुडून राहावे, अशी त्याची इच्छा होती. पण तुला या जगात जगन्मातेचे काही कार्य करायचे आहे, ते करावं लागेल, या श्रीरामकृष्णांच्या आदेशामुळे नरेंद्राने आपली इच्छा बाजूला ठेवली.

१५ ऑगस्ट १८८६ या दिवशी श्रीरामकृष्णांनी महासमाधी घेतल्यावर त्यांच्या आज्ञेनुसार नरेंद्र आणि त्याचे दहाबारा गुरुबंधू यांनी घरादाराचा त्याग केला आणि ते सारे एका छोट्या जुन्या घरात एकत्र राहू लागले तोच वराहनगर मठ होय. श्रीरामकृष्णांनी महासमाधी घेण्यापूर्वी त्यांना भगवी वस्त्रे आणि रुद्राक्षाच्या माळा दिल्या होत्याच. वराहनगर मठात एकत्र आल्यानंतर काही अवधी गेल्यावर या सर्वांनी विरजाहोम करून विधिपूर्वक संन्यास घेतला आणि नवीन नावे धारण केली. १८९० च्या मध्याच्या सुमारास विवेकानंदांनी कलकत्ता सोडली. गाझीपूरला पव्हारीबाबांच्या आकर्षणात काही दिवस घालवून बिहार, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश या मार्गाने ते मीरतला आले. तेथे एकाकी भ्रमण करण्याचा निर्णय घेतला. १८९१ च्या प्रारंभी निघून राजस्थान, काठेवाड, सौराष्ट्र, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू असा प्रवास करीत ते २४ डिसेंबर १८९२ या दिवशी कन्याकुमारीला पोहोचले. या परिभ्रमणामुळे वर्तमानकालीन भारताचे एक विराट दर्शन त्यांना घडले. शतकानुशतके हा समाज निद्रितावस्थेत आहे, असे भीषण चित्र विवेकानंदांच्या डोळ्यांसमोर होते.

कन्याकुमारीजवळच्या समुद्रात असलेल्या एका शिलाखंडावर ध्यानमग्न अवस्थेत बसलेले असताना या समाजाला जाग आणण्याचा संकल्प त्यांनी केला. त्यानंतर अमेरिकेत जाऊन शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्मपरिषदेस हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित राहिले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशी त्यांनी केलेल्या पाच मिनिटांच्या पहिल्या भाषणाने सारी सभा मंत्रमुग्ध झाली आणि सतरा दिवस चाललेल्या त्या परिषदेवर सर्वांत अधिक प्रभाव त्यांचा पडला. त्यानंतर सुमारे साडेतीन वर्षे त्यांचा अमेरिका आणि इंग्लंड येथे संचार झाला. बुद्ध आणि ख्रिस्त यांच्याशी त्यांची तुलना झाली. अनेक व्याख्याने त्यांनी दिली, वेदान्ताचे छोटेछोटे वर्ग घेतले, जे. जे. गुडविन, सेव्हियर पतिपत्नी, ओली बुल, सिस्टर ख्रिस्तिन, जोसेफाइन मॅक्लाउड अशा पाश्चात्य शिष्यांनी आपली जीवने विवेकानंदांच्या चरणी वाहिली. १८९७ च्या जानेवारीत भारतामध्ये परत आल्यावर कोलंबोपासून अलमोड्यापर्यंत विवेकानंदांचे भव्य स्वागत झाले.

धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान, भारतीय संस्कृती आणि भारतापुढचे आजचे प्रश्न यांवर त्यांनी दिलेली व्याख्याने आणि वेळोवेळी लिहिलेली पत्रे या सर्वांचा संग्रह विवेकानंद ग्रंथावलीच्या दहा खंडातील सु. तीन हजार पृष्ठांमध्ये आहे. 'पूर्व आणि पश्चिम' या लेखमालेतील त्यांच्या सुबोध व अर्थगर्भ शैलीने आधुनिक बंगाली भाषेला वळण दिले आहे, असे मत विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांनी व्यक्त केले आहे. विवेकानंदांचे विचार प्राधान्याने त्यांनी दिलेल्या व्याख्यानांमधून व्यक्त झाले आहेत.

हरएक धर्म हा ईश्वरत्वाकडे पोहोचण्यासाठी मानवाने केलेला एक प्रयत्न असतो. अन्य धर्मातील स्वीकारार्ह असेल, ते आत्मसात करणे आणि आपल्या प्रवृत्तीला अनुसरून ज्याने त्याने आपला आत्मिक विकास साधणे हा खरा मार्ग होय. त्यासाठी कर्म, भक्ती, योग वा ज्ञान यांपैकी कोणत्याही एकाचा, एकाहून अधिकांचा वा सर्वांचा एकत्रित अवलंब व्यक्तीने आपल्या रुचीनुसार करावा आणि मुक्त व्हावे. धर्मग्रंथ आणि कर्मकांड, देवदेवता आणि उपासनामार्ग, तत्त्वज्ञानविचार आणि चर्च, मशिदी वा मंदिरे या साऱ्या गोष्टी केवळ दुय्यम आणि साधनरूप होत. धर्म संकुचित असता कामा नये. पशुत्वाशी नाते असणाऱ्या तामस प्रवृत्तीच्या माणसापासून तो ईश्वरी अवतार वाटावा अशा महापुरुषापर्यंत सर्वांना आपल्या छायेखाली घेणारा व्यापक विश्वधर्म जगाला दिला पाहिजे. विवेकानंदांची धर्मसंकल्पना अशा तात्विक अधिष्ठानावर उभी होती. हिंदू धर्माचा अभिमान असला, तरी त्यांनी त्याचा प्रचार कधीही केला नाही. मानवमात्राला आपल्या ईश्वरत्वाची जाणीव करून देणे आणि व्यक्तीला आपल्या हरएक छोट्यामोठ्या कृतीत त्या ईश्वरत्वाचा आविष्कार करण्याचा मार्ग दाखवणे हे आपल्या जीवनाचे ध्येय आहे, असे विवेकानंदांनी म्हटले आहे. त्यासाठी १ मे १८९७ या दिवशी रामकृष्ण मिशन या नावाची संन्याशांची संस्था त्यांनी स्थापन केली. कलकत्त्यातील बेलूर मठ हे तिचे केंद्र–कार्यालय असून भारतात शंभर तर परदेशांत तीसपर्यंत शाखा कार्यरत आहेत. विवेकानंद हे एक द्रष्टे महापुरुष होते. धर्म हा भारतीय जीवनाचा मूलाधार आहे आणि विज्ञानयुगात होरपळणाऱ्या साऱ्या जगाला भारतातील अध्यात्मविचारामुळे शांती लाभणार आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांनी भारताला स्वतःच्या अस्मितेची जाणीव उत्पन्न करून दिली आणि पाश्चात्य जगाला भारताचा परिचय करून दिला. धर्माबरोबरच शिक्षण, राजकारण, समाजकारण, स्त्रियांची उन्नती, जनसामान्यांचा विकास अशा अनेक विषयांवर त्यांनी मूलगामी विचार व्यक्त केले आहेत. जगामध्ये यानंतर श्रमिकांच्या सत्तेचा उदय होणार आहे, हे भविष्यदर्शी उद्गार त्यांनी १८९८ मध्ये काढले. दरिद्रनारायण हा त्यांचा शब्द आहे. त्यांनी त्यागाला सेवेची जोड दिली आणि भारतात आजवर चालत आलेल्या संन्यासाच्या संकल्पनेत मूलभूत क्रांती केली. भारतातील अध्यात्म आणि पाश्चात्यांचे आधुनिक विज्ञान यांच्या समन्वयातून उद्याची आदर्श मानवसंस्कृती उदयाला येणार आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

बुद्धी व श्रद्धा, विचार आणि भावना, सामर्थ्य आणि करुणा, ऐहिक व आध्यात्मिक यांचा विवेकानंदांइतका उत्कृष्ट समन्वय दुसऱ्या कोणीही घातलेला नाही. भारताच्या आधुनिक युगाशी मेळ घालणारा व भविष्यातील समन्वयशील मानवसंस्कृतीची दिशा दाखवणारा असा श्रेष्ठ महापुरुष दुसरा दाखविता येत नाही. १८९९ च्या जूनमध्ये विवेकानंद पुन्हा यूरोप अमेरिकेत गेले, ते १९०० च्या डिसेंबरमध्ये परत आले. ४ जुलै १९०२ या दिवशी रात्री त्यांनी बेलूर मठात महासमाधी घेतली.

(साभार : विश्वकोष)

# राजमाता जिजाबाई भोसले



## निमित्त


छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री व शहाजीराजे भोसले यांच्या ज्येष्ठ पत्नी राजमाता जिजाबाई भोसले यांचे महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे; कारण त्या केवळ स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर दीनदुबळ्यांच्या, रयतेच्या मातोश्री होत्या. त्यांचे मूळ घराणे सिंदखेडच्या जाधवराव देशमुखांचे, सुखवस्तू शूर जहागीरदारांचे होते. जिजाबाईंची जन्मतारीख व साल यांविषयीची निश्चित माहिती उपलब्ध नाही; तथापि परंपरेचा दाखला देऊन त्यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी झाला, असे काही इतिहासकार मानतात; पण तत्कालीन घटना–घडामोडी पाहता जिजाबाईंचा जन्म इ. स. १५९५ नंतर व १६०० पूर्वी केव्हातरी झाला असावा.

वडील लखूजी जाधव हे निजामशाहीतील मातब्बर सरदार होते. त्यांच्या चाकरीत असलेले मालोजी भोसले यांचे चिरंजीव शहाजी यांच्याशी इ. स. १६०९–१० दरम्यान दौलताबाद किल्ल्यात जिजाबाईंचा विवाह झाला, असे शिवभारतकार सांगतो. त्या प्रसंगी मुर्थजा निजामशाह हजर होता. पुढे काही कारणाने भोसले व जाधव या घराण्यांत वैमनस्य आले. जिजाबाई व शहाजीराजे यांचा मुक्काम सुरुवातीस काही वर्षे वेरूळातच होता. पुढे शहाजी आपला मोकासा (जहागिरी) सांभाळून निजामशाहीच्या नोकरीत रुजू आले. त्या वेळी जिजाबाईंची त्यांच्यासोबत भ्रमंती चालू होती.

जिजाबाईंना एकूण सहा मुले झाली. त्यांपैकी संभाजी व छ. शिवाजी ही दोन मुले इतिहासात प्रसिद्ध असून वंशवर्धक ठरली. (१६५४). जिजाबाई शहाजीराजांच्या पुण्याच्या जहागिरीत इ. स. १६३६ पूर्वीच रहावयास आल्या. पुण्याच्या मुक्कामात त्यांनी बाल शिवाजींना लष्करी शिक्षणाबरोबर रामायण, महाभारत, भागवत आदींतील कथा सांगितल्या. जिजाबाईंनी विश्वासू सरदारांच्या मदतीने पुणे जहागिरीची उत्तम व्यवस्था लावली. पुण्यात लालमहाल प्रासाद बांधला, ओसाड जमीन लागवडीखाली आणली. त्यांनी कसबा पेठेतील गणपतीची पूजाअर्चा नियमित सुरू केली. इतर मंदिरांतूनही दिवाबत्तीची व्यवस्था केली. पुणे प्रांताच्या राज्यकारभारातील बारीकसारीक गोष्टींत लक्ष घालून त्यांनी अनेक वेळा न्यायनिवाडे केले. राजगडावर त्यांचा मुक्काम असताना खंडोबाच्या जेजुरी येथील मार्तंडभैरव मंदिराच्या गुरवपणाविषयी तंटा निर्माण झाला. त्याचा निवाडा जिजाबाईंनी केला होता. त्यावर 'मातोश्री साहेबे (जिजाबाईंनी) जे आश्वासन दिले आहे, तसेच माझेही आश्वासन राहील असे शिवाजी महाराज मातोश्रींच्या निर्णयास विरोध करत नसत. राज्यकारभारात शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत त्या राज्याची सर्व जबाबदारी सांभाळत असत. महाराज आग्राभेटीवर गेले असता त्यांनी सर्व कारभाराचा शिक्का जिजाबाईंच्या हाती सुपुर्द केला होता आणि त्यांना सहकार्य करण्याचे अभिवचन विश्वासू कारभाऱ्यांकडून घेतले होते. जिजाबाई स्वाभिमानी, धाडसी, करारी, दृढनिश्चयी आणि स्वतंत्र वृत्तीच्या होत्या. छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर बारा दिवसांनी त्यांचे पाचाड (रायगड) येथे निधन झाले. (साभार : मराठी विश्वकोष)

## चित्र रंगवा






# पोको एम ८ स्मार्टफोन भारतात झाला लॉन्च

नवी दिल्ली ३ दिवसांपूर्वी टेक कंपनी शाओमीच्या सब–ब्रँड पोकोने ८ जानेवारीला भारतात आपली 'एम' सिरीजमधील नवीन स्मार्टफोन 'पोको एम८' लॉन्च केला आहे. हा 5G स्मार्टफोन ५० मेगापिक्सलचा मेन कॅमेरा, स्नॅपड्रॅगन ६ जेन ३ प्रोसेसर आणि कर्व्ह OLED डिस्प्लेसह बाजारात आणला गेला आहे.



याव्यतिरिक्त, इंट्रोडक्टरी ऑफर म्हणून बेस व्हेरिएंट १५,९९९ रुपयांच्या किमतीत फक्त १२ तासांसाठी उपलब्ध करून दिला जाईल. ही ऑफर फक्त १३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजल्यापासून सुरू होईल आणि पुढील १२ तास लागू राहील. पोको एम८च्या डिझाइनमध्ये प्रीमियम लुक देण्याचा प्रयत्न केला आहे. फोन फक्त ७.३५mm पातळा आहे, त्याचे वजन १७८ ग्रॅम आहे आणि यात ३डी कर्व्ह बॉडी डिझाइन मिळते, ज्यामुळे तो हातात धरल्यावर फ्लॅगशिप फोनसारखा अनुभव देईल.

फोनमध्ये ६.७७ इंचाची मोठी आणि कडांपासून वक्र ३डी एमोलेड स्क्रीन दिली आहे. याची ब्राइटनेस ३२०० निट्स आहे, याचा अर्थ तीव्र सूर्यप्रकाशातही तुम्हाला स्क्रीन स्पष्ट दिसेल. यात १२०Hz रिफ्रेश रेट दिला आहे, म्हणजेच डिस्प्ले खूप स्मूथ आहे. विशेष तंत्रज्ञान मुळे, दीर्घकाळ फोन वापरल्यानंतरही डोळ्यांवर ताण कमी येईल.

फोन लेटेस्ट अँड्रॉइड १५ आणि शाओमीच्या नवीन हायपर OS२वर चालतो. यात गुगल जेमिनी आणि 'सर्कल टू सर्च' सारखे स्मार्ट एआय फीचर्स मिळतील. कंपनीचे म्हणणे आहे की, फोनला ४ मोठे अँड्रॉइड अपडेट्स आणि ६ वर्षांपर्यंत सिक्युरिटी अपडेट्स मिळत राहतील.

फोन लेटेस्ट अँड्रॉइड १५ आणि शाओमीच्या नवीन हायपर OS२वर चालतो. यात गुगल जेमिनी आणि 'सर्कल टू सर्च'सारखे स्मार्ट एआय फीचर्स मिळतील.

फोटोग्राफीसाठी मागील बाजूस ५० मेगापिक्सलचा मुख्य कॅमेरा आहे, जो ४ एमपी व्हिडिओ रेकॉर्ड करू शकतो. यात खराब फोटो दुरुस्त करण्यासाठी एआय मॅजिक इरेजर आणि स्काय रिप्लेसमेंट यांसारखी वैशिष्ट्ये आहेत. सेल्फीसाठी समोरच्या बाजूला २० मेगापिक्सलचा कॅमेरा जो अस्पष्ट फोटो देखील एआयच्या मदतीने स्पष्ट करतो.



## आरोग्य प्रहर

# थायरॉईडमध्ये औषधांपेक्षा ही पाच फळे गुणकारी

सध्या लोकांमध्ये थायरॉईडची समस्या सामान्य झाली आहे. थायरॉईड ही फुलपाखराच्या आकाराची एक छोटी ग्रंथी आहे जी आपल्या गळ्यात असते. ही ग्रंथी थायरॉक्सिन संप्रेरक तयार करते, जे शरीरातील चयापचय दर, वाढ आणि पेशींची दुरुस्ती करण्यास मदत करते. जर हा हार्मोन नीट काम करत नसेल तर शरीरात अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. थायरॉईडच्या रुग्णांनी त्यांच्या आहाराची विशेष काळजी घ्यावी.



**सफरचंद** – रोज एक सफरचंद खाल्ल्याने तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहू शकता. यामध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट मुबलक प्रमाणात असतात, जे शरीराला फ्री रॅडिकल्सपासून वाचवण्यास मदत करतात. थायरॉईडच्या रुग्णांसाठी हे खूप फायदेशीर आहे. याव्यतिरिक्त, हे वजन कमी करण्यास आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास देखील मदत करते.

**पेरू** – पेरू फक्त खाण्यासच स्वादिष्ट नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन–ए, व्हिटॅमिन–बी९, व्हिटॅमिन–सी, व्हिटॅमिन–ई, फायबर, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि ओमेगा–३ फॅटी ॲसिड सारखे पोषक घटक असतात. याच्या सेवनाने थायरॉइडच्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. **संत्र** – थायरॉईडच्या रुग्णांसाठी संत्र्याचे सेवन खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासोबतच थायरॉईड ग्रंथीतील सूजही कमी करते. संत्र्याचे नियमित सेवन केल्यास शरीराला अनेक फायदे मिळू शकतात.

**बेरीज** – बेरीमध्ये अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात, जे ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून पेशींचे संरक्षण करण्यास मदत करतात. ते थायरॉईड संप्रेरकांचे उत्पादन वाढवण्यास आणि वजन कमी करण्यास देखील मदत करतात. थायरॉईडचे रुग्ण त्यांच्या आहारात स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी आणि रास्पबेरी समाविष्ट करू शकतात.

**किवी** – थायरॉईडच्या रुग्णांसाठी किवीचे सेवन फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट मुबलक प्रमाणात असतात. याच्या सेवनाने रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास आणि थायरॉईड नियंत्रित ठेवण्यास मदत होते. हे हृदय निरोगी ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. याच्या नियमित सेवनाने वजन कमी करण्यासही मदत होते

# ‘महाराष्ट्रातील प्रत्येक गावागावात हिंदू जनजागृती होणे काळाची गरज’



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यवत संघ, राष्ट्रीय बजरंग दलातर्फे अयोजित विराट हिंदू एकता संमेलन पोद्दार समृद्धी क्लब हाऊसमध्ये आंतरराष्ट्रीय बजरंग दल संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या नेतृत्वात शनिवारी उशिरा पार पडले. यावेळी आंतराष्ट्रीय बजरंग दल रसायनी, खालापूर, रायगड जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावरून दिनेशदादा पाटील बोलत होते की, या देशातील हिंदू जागृत होत आहे, हिंदूना जागृत करण्यासाठी राष्ट्रीय बजरंग दल गाव वाड्या,वस्त्यानवर बजरंग दलाचे कार्यकर्ते नागरिकांत जाऊन जन जागृत करत आहेत.बदलापूर येथे हा ठेवण्यात आलेला कार्यक्रम देखावा किवा शोभेसाठी ठेवलेला नसून तो हिंदू बांधवाना एकत्रित आणन्यासाठी असून हि तर एक चिंगारी आहे,असे कार्यक्रम महाराष्ट्र राज्यात प्रत्येक गावा गावात होणे आज काळाची गरज बनलेली आहे.असे कार्यक्रम गावो गावी ठेवण्यासाठी पदाधिकारी कार्यकर्ते यांकडे पैसेच पाहिजे असावेत असे काही नाही ,सर्व हिन्दू यांनी एकत्रित आल्यास उत्तम प्रकारे जन जागृती होऊन अतिशय सुलभ होणारी आहे. यावेळी कोकण प्रांत मंत्री सचिन धुळे,ठाणे जिल्हा मंत्री विशाल जैस्वाल, रायगड जिल्हा अध्यक्ष बाबू भोईर,मावळ लोकसभा अध्यक्ष राकेश खराडे,उरण विधानसभा अध्यक्ष जनार्दन मालूसरे,ठाणे जिल्हा अध्यक्ष सुरज ( बादशाह ),ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष राकेश टेंबे,ठाणे सह जिल्ला मंत्री चेतन जामगरे,कृश कमुनी पोद्दार संपर्क प्रमुख,वांगणी शहराध्यक्ष महेंद्र भाई,रायगड गोरक्षा प्रमुख मलेश गुडसे,शेलू शहराध्यक्ष भरत भाई,खालापूर तालुकाध्यक्ष प्रशांत तांबोळी,कर्जत तालुकाध्यक्ष केवल भाई,प्रदीप गुप्ता,दुर्गाशक्ती पोद्दार समृद्धी ,प्रिया जैसवाल अध्यक्ष ,उपाध्यक्ष साधना सिंह, कुशी सिंह, प्रदीप गुप्ता,अंतर राष्ट्रीय बजरंग दल दुर्गाशक्ती ठाणे जिल्हा अध्यक्ष,कु राणी राजेश जवळेकर, जैस्वाल ठक्करआदिसह पदाधिकारी व बजरंगी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यात उत्तम कामगिरी करणाऱ्या पहिल्या पाच मंत्र्यांमध्ये आदिती तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

पालकमंत्री कोण होणार या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आपल्या कर्तुत्वाने विकास निधी ना.अदिती तटकरे यांनी आणला आहे. रायगड जिल्ह्याचा विकास होत असताना लाडकी बहीण योजना व आईचे नाव सरकारी दरबारी नोंद यामुळे राज्यात घरोघरी पोहोचलेल्या अदिती तटकरे राज्यातील चांगले काम करणाऱ्या पहिल्या पाच मंत्र्यामध्ये असल्याचे दिसून येते.

पक्ष श्रेष्ठींनी मंत्री म्हणुन दिलेली जबाबदारी योग्य रित्या पार पाडत वडील व प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रिमंडळात एकमेव महिला मंत्री असून सुद्धा चांगले काम करीत आहेत. पहिल्या राज्यमंत्री म्हणून व आता कॅबिनेट मंत्री म्हणून उत्कृष्ट कामगिरी करीत रायगड जिल्ह्याचा विकासाचा आलेख उंचावत आहेत.

महिला व बालकल्याण मंत्री झाल्यानंतर महिला सक्षमीकरणासाठी लाडकी बहिणी योजना च्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी पुढाकार घेतला महिलांना उद्योग मिळावे यासाठी राज्यात नवतेजस्विनी गारमेंट युनिट उभारण्यास सुरुवात केली. यातीलच कोकण विभागातील पहीले युनिट रोहा येथे सुरू करण्यात आले.

महिला बचत गटांना त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. अशा अनेक चळवळी महिलांसाठी त्यांनी उभे करत राज्यात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.

आज राज्यभर निवडणुकीच्या प्रचारानिमित्ताने फिरताना त्या दिसत आहेत. या निमित्ताने पक्षाची व आपली भूमिका ठाम मांडताना दिसत आहेत.

महाराष्ट्र दिनमान या वेब पोर्टल आणि यू ट्यूब चॅनलच्यावतीने संपादक विजय चोरमारे यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या कामकाजासंदर्भातील सर्व्हे करण्यात आला. राज्यभरातील पन्नास पत्रकारांच्याकडून माहिती संकलित करण्यात आली. त्यामध्ये काही प्रमुख वृत्तपत्रांचे विद्यमान तसेच ज्येष्ठ संपादक, मंत्रालयात काम करणारे राजकीय पत्रकार, विविध शहरांमध्ये फिल्डवर काम करणारे वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी, राजकीय सामाजिक भान असलेले विविध थरांतले नवे-जुने पत्रकार यांचा समावेश होता. राज्याच्या सर्व विभागातील आणि जबाबदार नेते म्हणून कामगिरी अशा सहा मुद्द्यांच्या अनुषंगाने मंत्र्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यात आले.

बावनकुळे, शेलार आणि सामंत यांच्यासह उत्तम कामगिरी असलेल्या पहिल्या पाच मंत्र्यांमध्ये महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचा समावेश आहे. चंद्रशेखर बावनकुळे (४७ टक्के), आशिष शेलार (४५), उदय सामंत (४२.८), आदिती तटकरे (४१.१) आणि प्रकाश आबिटकर (३७.५) असे गुण मिळाले आहेत.

## मंगेश काळोखे हत्येचा कर्जतमध्ये निषेध; हल्लेखोरांना फाशीच्या शिक्षेची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

खोपोलीच्या नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची क्रूर हत्या करण्यात आली. त्याच्या निषेधार्थ कर्जत मधील शिंदेसेनेच्या शिवसैनिकांनी निषेध व्यक्त करीत. सर्व हल्लेखोरांना फाशीची शिक्षा करावी. अशी मागणी करून पोलिसांना निवेदन देण्यात आले

कर्जत शहरातील लोकमान्य टिळक चौकात शिंदे सेनेचे जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, तालुकाप्रमुख सुदाम पवळी, सुरेश टोकरे, मनोहर थोरवे, शिवराम बदे, अमर मिसाळ, संकेत भासे, प्रसाद थोरवे, मनोज खेडकर, गजेंद्र वाघेश्वर, संजय मोहिते, ज्ञानेश्वर भगत, सुरेखा शितोळे आदी पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक आणि काळोखे कुटुंबातील सदस्य उपस्थित झाले. त्यांनी या क्रूर हत्येच्या घटनेचा निषेध करीत घोषणा दिल्या. यावेळी बदे यांनी, ' मंगेश काळोखे यांच्या सर्व हल्लेखोरांना कठोरात कठोर शासन करावे.' अशी मागणी केली. संतोष भोईर यांनी, ' झालेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या हत्येमधील आरोपिंना फाशीची शिक्षा द्यावी.' अशी मागणी केली. त्यानंतर सर्व जण पोलीस ठाण्यात गेले आणि पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांना निवेदन दिले.

याप्रसंगी अंकुश दाभणे, रत्नाकर बडेकर, प्रदीप वायकर, किशोर कदम, रोहित ओसवाल, कोयल कन्हेरीकर, सायली शहासने, दिनेश कडू आदी उपस्थित होते.




## पद्मदुर्ग जागर सोहळा; गडावर शिवशाही अवतरली!

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्था , कोकण कडा मित्र मंडळ रायगड व सर्व संलग्न शिवप्रेमी संस्थांच्या वतीने आज १७ वा पद्मदुर्ग जागर सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या शिवशाही सोहळ्या करिता पर्यटकांसह शेकडो शिवप्रेमी यांनी पद्मदुर्ग किल्ल्यावर हजेरी लावली.



यावेळी सकाळी शिवप्रेमी यांनी डोक्यात भगवे फेटे घालून मुरुड राधाकृष्ण मंदिरा पासुन शिवपालखीला सुरुवात करण्यात आली राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज की जय जयभवानी जय शिवाजी,हर हर महादेव,कोटेश्वरी मातेच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता ही पालखी खोरा बंदरा पर्यत आणण्यात आली. त्यानंतर बोटीने पालखी पद्मदुर्ग किल्लात आणण्यात आली.सकाळ पासून शिवप्रेमी यांनी किल्लात येऊन पुन्हा किल्ला स्वच्छ व चकाचक करण्यात आला.त्यानंर संपुर्ण गडाला फुलांने सजवले.ठिक ठिकाणी भगवे झेंडे लावण्यात आले.यामुळे भगवेमय वातावरण तयार झाले होते.

इतिहास अभ्यासक- प्रतिक कालगुंडे यांनी शिवरायांची राजनीती व सर्वसमभाव सर्व जातीचे मावळे घेऊन स्वराज्य घडवले ते कसे त्यांच्या व्याखनात सांगितले.तसेच शिवरायांच्या राजनीती बाबत या चित्तथराक कथा सांगून शिवरायांचे मावळे बाजीप्रभू देशपांडे यांनी पावनखिंड स्वराज्यासाठी कशी लढवली याचे रोमहर्षक वर्णन करून शिवप्रेमीना एक नवा जोश दिला .तद्नंतर शिवप्रेमींनी विविध शिवकालीन शौर्याचे खेळ बाणापट्टा ,तलवारबाजी मलखांब ,पारंपरिक गोंधळ सादर करण्यात आला.यावेळी डॉक्टर राज कल्याणी यांच्या कडुन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तद्नंतर गडाची स्वच्छता करणात आली.

यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, मुरूड पद्मदुर्ग जागर व गडभ्रमण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर ,राजपुरोहित-प्रकाश स्वामी जंगम,राहुल कासार, रुपेश जामकर, डॉक्टर -मयुर कल्याणी, डॉक्टर भाविका कल्याणी,कोकण कड़ा मित्र मंडळ रायगड -शेखर मामा फरमन , उपाध्यक्ष -संकेत वडके,सुरेश पवार ,अनिकेत कदम ,,प्रकाश दाभेकर ,विजय वाणी,प्रदिप बागडे, महेंद्र मोहिते , संदिप घरत,नेहा पाके, बाळा साखरकर,मिलिंद भगत,महेश साळुंखे,प्रविण पाटील,रुपेश रणदिवे, अच्युत चव्हाण, अनुराधा चव्हाण, अमित पाटील,सतेज विरकुड, प्रकाश वाडकर,हसमुख जैन,माजी सरपंच अजित कासार,आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर आदिंसह शिवप्रेमी उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शिवछत्रपती शिवाजी महाराजांचे ज्या वास्तू आहेत त्या पुढच्या पिढी पर्यत शाबुत राहण्यासाठी त्यांचे अस्तित्व चिरकाल टिकणे खूप महत्वाचे आहे. .किल्लाचे संवर्धन व जतन करण्याकरिता मी शिवभक्त म्हणून अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

याठीकाणी येणाऱ्या शिवभक्त चा मार्ग सुकर व्हावा यासाठी जेट्टी असेल प्रवासी जेट्टी त्याबरोबर पावसाळ्या दरम्यान सुध्दा शिवभक्त येथे कसे येतील त्याकरिता आम्ही प्रयत्न करणार याठिकाणी किल्ल्याचे संवर्धन व जतन अत्यंत जरुरी आहे.

पद्मदुर्ग किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा व छत्रपती संभाजी महाराजाचा स्मारक या ठिकाणी झाले पाहिजे.त्यासाठी आम्ही केद्र सरकार व राज्य सरकाराला आम्ही विनंती करणार असल्याचे सांगितले.

## शेठ जे.एन. पालीवाला महाविद्यालयात ‘फुलोरा २०२६’



**पाली : प्रतिनिधी**

शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन ‘फुलोरा-२०२६’ अंतर्गत वार्षिक, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गणेश चंदनशिवे उपस्थित होते. ते विभागप्रमुख, लोककला अकादमी मुंबई विद्यापीठचे प्रमुख असून, त्यांनी बाजीराव मस्तानी चित्रपटासाठी केलेल्या पार्श्वगायनाच्या अनुभवांद्वारे विद्यार्थ्यांना सृजनशीलतेचे महत्त्व पटवून देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी भारूड व गोंधळ यांचे सादरीकरण करून कार्यक्रमात लोककलेची रंगत आणली. या सादरीकरणामुळे सभागृहात उत्साहाची लाट पसरली व कार्यक्रमाला विशेष उंची मिळाली.

कार्यक्रमास सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीता पालरेचा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग, सेक्रेटरी ग .रा .म्हात्रे, संचालिका हर्षाताई चांदोरकर व संचालिका तृप्ती मराठे, तसेच संचालक रमेश साळुंखे , घोडके सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डी. जी. मुंढे, प्रा. कु. विशाखा मानकामे व प्रा. संदेश गावडे यांनी केले. स्नेहसंमेलनाच्या प्रमुख प्रा. अस्मिता पाटील यांनी कार्यक्रमाची संकल्पना मांडली. आयक्यूएसी समन्वयक प्रा.डी आर. शिवपुजे, क्रीडा विभागप्रमुख प्रा. संतोष भोईर, सर्व विभागप्रमुख, कार्यालय अधीक्षक सी. आर. चिले, पत्रकार, माजी विद्यार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी इतिहास विभागातील प्रा.डॉ. अंकुश सोहनी व प्रा. ज्ञानेश्वर मुंडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. प्रा. राकेश शिर्के व प्रा.संतोष भोईर यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

## डोलवी येथे दासबोध सामुदायिक पारायण सोहका

**पेण** : तालुक्यातील डोलवी येथे शुक्रवार ९ जानेवारी ते मंगळवार १३ जानेवारी २०२६ पर्यंत दासबोध पारायणाचा ५ दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमात प्रवचन दररोज १२ वाजता, हरीपाठ सायंकाळी ५ वाजता, किर्तन रात्रौ ७ ते ९ वाजता होईल. दररोज पहाटे पाच वाजता काकडा होईन, रात्रौ संगित भजन होईन. शुक्रवार ९ जानेवारी रोजी ह.भ.प.राऊत महाराज यांचे प्रवचन संत सेवा मंडळ निगडे यांचा हरीपाठ झाला. ह.भ.प. दिनेश महाराज कडव रोहा यांचे किर्तन झाले. शनिवार १० जानेवारीला ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जाधव पुणे यांचे किर्तन झाले. ह.भ.प. भागीरथी व कविश महाराज डोलवी यांचे प्रवचन झाले. रविवार ११ जानेवारीस परम्पुज्य स्वामी अरुण चैतन्यजी महाराज डोलवी यांचे प्रवचन, ज्ञानेश्वरी हरीपाठ मंडळाचा प-पुज्य र ह.भ.प. दिनेश महाराज डोलवी यांचे काल्याचे किर्तन होऊन कार्यक्रमाची सांगता होईल.



**रोहा : श्री द्वारकामाई मित्र मंडळाची शिर्डी पदयात्रा निघाली. यंदाचे हे १४ वर्ष आहे. या वेळी उपस्थित साईभक्त.** (छाया : जितेंद्र जाधव)


### जाहिर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-हरिग्राम, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजेः हरिग्राम, तालुका- पनवेल, जिल्हा -रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| हरिग्राम | १ अशोक गोवीद भीपी<br>२. शांताबाई धाऊ घरत<br>३ लताबाई बाळाराम भोपी<br>४. वंदना पंढरीनाथ तांबोळी<br>५. उषाताई बाळाराम म्हात्रे<br>६. कुंदाताई पाडुरंग भागवत<br>७. कृष्णाबाई पाडुरंग भोपी<br>रा. हरिग्राम,<br>ता. पनवेल, जि. रायगड | ५३/१ | ०.८६.२०<br>०.१२.९०<br>०.९९.१० पैकी<br>७६.१०<br>हे.आर.पॉ<br>क्षेत्रफळ | १३.६९ |
| | | एकुण | ७६.१० | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक: ११/०१/२०२६**

**सही/-**
**अॅड. सरिता महेंन्द्र साखरे**
पत्ता- ०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं.१२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६.



### मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

पत्ता: भुखंड क्र.१, सेक्टर २२, फेज २, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१० २०८ नोंदणी क्रमांक: एन, बी. ओ. एम, सिडको/एच एस जी (टी.सी)/१०४५३/ए. आर/सन २०२५-२०२६ Emall: marwachssector22@gmail.com

जाहिर निविदा

| निविदा क्र. | निविदा तपशिल | निविदा सादर करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| निविदा १ | १८ सुरक्षा रक्षक आणि २ पर्यवेक्षक अधिकारी, १२ तासांचे २ शिफ्ट् | दिनांक पर्यत १७.०१.२०२६, | सोसायटी कार्यालय, मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, भुखंड क्र. ०१, सेक्टर २२, फेज २,तळोजा, नवी मुंबई |
| निविदा २ | गतीरोधक (१०) | | |
| निविदा ३ | वाहनांचे व्हील जॅमर (१०) | | |

आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे कळावे

**सही/-** **अध्यक्ष** **श्री कुलदीप पवार** | **सही/-** **सचिव** **श्री. विजय पाटील** | **सही/-** **खजिनदार** **श्री. गणेश शिंदे**

दिनांक: १२/०१/२०२६

: व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने :-
मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित



**मृद व जलसंधारण विभाग**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांचे कार्यालय**
प्लॉट नं. २१५, पहिला मजला, विद्या नगर, चेंढरे-अलिबाग, जि. रायगड
email: dwcoraigad@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र. २१/ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड हे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या नोंदणीकृत सक्षम निविदाकांराकडून खालील कामाकरीता ई-निवीदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निवीदा मागवित आहोत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत.

सविस्तर निविदा सुंचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजीत एकुण किंमत रु. |
|---|---|---|
| १ | सिमेंट कॉक्रिट नाला बंधारा बांधणे मौज मापगाव क्र. २ ता. अलिबाग जि. रायगड | १७,५०,०१४/- |
| २ | सिमेंट कॉक्रिट नाला बंधारा बांधणे मौज परहूर क्र. २ ता. अलिबाग जि. रायगड | ३१,२३,१७३/- |
| ३ | सिमेंट कॉक्रिट नाला बंधारा बांधणे मौज कुणे ता. अलिबाग जि. रायगड | १५,४९,७२६/- |
| ४ | सिमेंट कॉक्रिट नाला बंधारा बांधणे मौज ऐनवहाळ ता. रोहा जि. रायगड | २१,७७,१५०/- |
| ५ | गेटेड सिमेंट कॉक्रिट नाला बंधारा बांधणे मौज घेरासुरगड ता. रोहा जि. रायगड | १६,४५,११६/- |
| ६ | मौजे जांभोशी-पावळ येथे अमृत सरोवर बांधणे ता. पेण जि. रायगड | ४४८१६१८/- |

निविदा उपलब्ध कालावधी - दिनाक १२/०१/२०२६ ते १९/०१/२०२६
निविदा उघडण्याचा दिनाक - २१/०१/२०२६
जा.क्र. जिजअ/मृवजवि / रायगड /लेशा/ ५३ /२०२६
दिनांक :- ०८/०१/२०२६

सही/-
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग, रायगड

आरओसी/२०२५-२०२६/क्र-५/सी ५०९८

# उरण रेल्वे मार्गावर दोन वर्षात ४२ लाख नागरिकांचा प्रवास

## मागील वर्षीपेक्षा १२ टक्के प्रवाशांची वाढ

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण-नेरूळ-बेलापूर या रेल्वे मार्गावर मागील दोन वर्षांत ४२ लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. जानेवारी ते डिसेंबर - २०२५ दरम्यान या रेल्वे मार्गावर मागील वर्षीपेक्षा १२ टक्के प्रवाशांची वाढ झाली असल्याची माहिती रेल्वे सूत्रांनी दिली.

प्रदिर्घ काळाच्या प्रतिक्षेनंतर अखेर १२ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उरण-नेरूळ रेल्वे मार्गाचे उद्‌घाटन झाले. तेव्हापासुन प्रवासी या रेल्वे मार्गावरून प्रवासी वाहतूकीला अखंडपणे सुरूवात झाली आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२४ या दरम्यान १९ लाख प्रवाशांनी या रेल्वे मार्गावर प्रवास केला आहे. तर जानेवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान या रेल्वे मार्गावरून २३ लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. २०२५ या वर्षात १२ टक्के प्रवाशांची वाढ झाली असल्याची माहिती रेल्वे सूत्रांनी दिली.

अटल सेतू, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि परिसरातील विविध प्रकल्पांमुळे उरण-नेरूळ-बेलापूर या रेल्वे मार्गावर प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. प्रवाशांची वाढती संख्या आणि विमानतळ कनेक्टिव्हिटीमुळे रेल्वे फेऱ्या वाढवण्याची सातत्याने मागणी होत असतानाच आता डिसेंबर (दि. १५) पासून उरण-नेरूळ-बेलापूर या रेल्वे मार्गावर १० फेऱ्या वाढविण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर या मार्गावरील रखडलेली तरघर व गव्हाण या दोन्ही स्थानकात लोकल थांबेही सुरू झाले आहेत. यामुळेही प्रवाशांची संख्या वाढली आहे, मात्र अप आणि डाऊन उरण-नेरूळ-बेलापूर या रेल्वे मार्गावर १० फेऱ्या वाढविण्यात आल्याने प्रवासी संख्येत वाढ झाली असली तरी सकाळी १०.३० ते वाजता ५.३० दरम्यान एक-एक तासाच्या अंतराने ट्रेन सोडण्यात येत आहेत.

बेलापूर-नेरूळ स्थानकावरून ११.३० वाजल्यानंतर १.०० वाजता ट्रेन सुटते. तर याच मार्गावर दुपारी ३.३५ वाजल्यानंतर संध्याकाळी पाच वाजता ट्रेन सोडण्यात येत आहेत. हा दिड तासांचा आणि सकाळी १०.३० ते वाजता ५.३० दरम्यान एक-एक तासाच्या अंतराने सोडण्यात येणाऱ्या लोकलमुळे प्रवाशांना नाहक तास-दिड तासांपर्यंत ट्रेनसाठी प्रतिक्षा करावी लागते.

या दरम्यान कंटाळून इच्छित स्थळी पोहचण्यासाठी प्रवासी इतर साधनांनी प्रवास करतात. तसेच बेलापूर व उरण स्थानकातुन रात्री १०.३० वाजता शेवटची लोकल सुटते. यामुळेही प्रवाशांची गैरसोय होत आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने प्रयत्न करण्याची प्रवाशांची मागणी आहे.



### वातानुकूलित लोकलची मागणी

उरण-नेरूळ व बेलापूरदरम्यान सुरू असलेल्या ४० फेऱ्यांमध्ये आणखी २० फेऱ्या वाढविण्याची मागणी प्रवाशांकडून सातत्याने केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती, मात्र प्रत्यक्षात फक्त १० फेऱ्याच वाढविण्यात आलेल्या आहेत. तसेच उरण-नेरूळ व बेलापूर मार्गावर वातानुकूलित लोकल तसेच उरण स्थानकातुन सीएसटी, ठाणे, पनवेल पर्यंत थेट लोकलसेवा सुरू करण्याचे आश्वासनही रेल्वेमंत्र्यांनी दिले होते.

# नवी मुंबईत भाजपची सत्ता येणार

## मंत्री गणेश नाईक यांचा विश्वास

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शहरातील लोकांनी गेले पंचवीस वर्षे गणेश नाईकांवर प्रेम केले आहे, त्यामुळे महापालिकेत या वेळी भाजपची सत्ता येणार असल्याचा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी शिरवणे, नेरूळ विभागात पॅनल २१ नेरूळमधील भाजपचे उमेदवार माधुरी जयेंद्र सुतार, जयवंत दत्तात्रेय सुतार, मीरा पाटील, सुरेश शेट्टी यांच्या प्रचारासाठी नेरूळ येथे घेतलेल्या निर्धार विजयाच्या प्रचार सभेत गणेश नाईक बोलत होते.

या वेळी उमेदवार प्रभाग क्रमांक २१ अ. माधुरी जयेंद्र सुतार २१ ब. मीरा पाटील, २१ क. जयवंत दत्तात्रेय सुतार, २१ ड. सुरेश शेट्टी यांच्या कार्य अहवाल प्रकाशन करण्यात आला. मंत्री नाईक म्हणाले की, भाजपची नवी मुंबई महानगरपालिकेवर सत्ता येणार असल्याचे गणेश नाईक यांनी सांगून सन २००२ साली मी जनतेला आश्वासित केले होते की येणाऱ्या वीस वर्षात नवी मुंबई महानगरपालिकेच्या कोणताही टॅक्स वाढणार नाही व मी कोणत्याही टॅक्स वाढवून दिला नाही यापुढे आणखी वीस वर्ष वाढवून देणार नाही.



मोरबे धरणाच्या विकत असताना पंचवीस वर्षाचे ध्येय धोरण ठरविले होते मात्र नवी मुंबईतील वाढती संख्या लक्षात घेता भविष्यात पाणीटंचाई होऊ नये म्हणून कर्जत जवळील पोशिर धरण घेण्याचे सुद्धा आश्वासित केले. तसेच परिवहन सेवा सुरू करण्याचा शब्द दिला होता आज रोजी परिवहन सेवा सुरू आहे ज्येष्ठ नागरिकांना मोफत सेवा देत असताना महाराष्ट्रातील कुठल्याही शहरात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान होत नाही. म्हणूनच नवी मुंबई महानगरपालिकेवर १६ तारखेला भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकेल असा मला ठाम विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या पहिल्या सभागृहात नगरसेवक असताना पाणीपुरवठा सभापती ते महापौर म्हणून जे उल्लेखनीय कामगिरी केली आहे ती कामगिरी दिघा ते बेलापूर पर्यंतच्या नगरवासीयांना माहिती आहेच माझी काम करण्याची प्रचंड इच्छाशक्ती व काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव बघता पुन्हा सेवक म्हणून प्रभागात रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पर्यावरणपूर्वक सुविधा व सुरक्षित नेरूळ घडवण्यासाठी आपण काटेकोरपणे प्रयत्न करणार असल्याचे प्रभाग क्रमांक २१ क चे उमेदवार जयवंत सुतार यांनी सांगितले.

# आम्ही सगळे खान्देशाच्या संस्कृतीचा सन्मान करणारे -आमदार प्रशांत ठाकूर

## चुकीच्या पद्धतीने वाद निर्माण करण्याचा प्रयत्न

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खान्देशातील कार्यकर्त्यांच्या बैठकीवरून विनाकारण गैरसमज पसरवण्याचा आणि राजकीय वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जात असल्याची तीव्र टीका आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

या प्रकरणावर आपली भूमिका स्पष्ट करताना त्यांनी माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांच्या वर्तनावर नाराजी व्यक्त केली. आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, खान्देशातील काही कार्यकर्त्यांनी स्वतःहून पाठिंबा देण्यासाठी बैठक घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार भाजप महायुतीचे प्रभाग ४चे अधिकृत उमेदवार मधू पाटील यांनी बैठक आयोजित केली आणि खान्देशातील मंडळी त्यांच्या आमंत्रणावरून उपस्थित राहिली. या बैठकीदरम्यान चर्चा सुरू असताना अचानक नेत्रा पाटील तिथे आल्या व थेट व्यासपीठावर जाऊन बसल्या.

हा कार्यक्रम नेत्रा पाटील यांच्यासाठी किंवा त्यांच्या वतीने आयोजित केलेला नव्हता. त्यामुळे उपस्थित सर्वांनी त्यांना विनंती केली की हा कार्यक्रम तुमचा नाही, कृपया तुम्ही येथे थांबू नका. व्यासपीठावर उपस्थित असलेले आमदार महेश बालदी यांनीही त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी कोणाच्याही आग्रहाला मान दिला नाही. अखेरीस ज्या खान्देशी मंडळींच्या पाठिंब्यावर त्या पूर्वी निवडून आल्या होत्या, त्यांनाच त्यांना तिथून जाण्याची विनंती करावी लागली, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.



या घटनेचे वेगळ्या पद्धतीने चित्रण करून सोशल मीडियावर चुकीचा प्रचार केला जात असून, आमदार महेश बालदी यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले. आम्ही सगळे खान्देशाच्या संस्कृतीचा सन्मान करणारे आहोत. गिरीश महाजन, जयकुमार रावल यांसारखे आमचे नेते खान्देशातून आलेले असून त्यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा आणि परिसराचा विकास झाला आहे. त्या नेतृत्वाचा आम्हाला अभिमान आहे. अशा वेळी आमच्या नेत्यांना चॅलेंज करण्याची भाषा करून स्वतःची प्रतिमा मोठी करण्याचा केविलवाणा प्रयत्न जनतेला नक्कीच कळेल, असा टोला त्यांनी लगावला.

भाजप हा महिलांचा सन्मान करणारा पक्ष असल्याचे सांगत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आज देशाच्या राष्ट्रपती आदिवासी समाजातून आलेल्या महिला आहेत. समाजातील शेवटच्या घटकाला पुढे नेण्याचा विचार आमचा आहे. त्यापलीकडे आम्ही काही वेगळा विचार करू शकत नाही. नेत्रा पाटील यांना तिकीट नाकारण्यात आल्याबाबत बोलताना ते म्हणाले, नगरसेवक होण्याचे गारुड आणि त्यामागील अपेक्षित फायदे पूर्ण होणार नाहीत, याची जाणीव झाल्यामुळेच पक्षाने त्यांना तिकीट दिले नाही. अशा वेळी एखाद्या व्यक्तीने शांत बसणे अपेक्षित असत, पण त्यांनी उलट आमच्या नेतृत्वालाच आव्हान देण्याची भाषा सुरू केली आहे. आमच्या पक्षातील महिला कार्यकर्त्याही त्यांना त्यांच्या भाषेत उत्तर देतील, अशी वेळ येऊ नये, एवढीच आमची इच्छा आहे.

निवडणुकीचे अवघे चार दिवस शिल्लक असताना विकासाच्या मुद्द्यांवर प्रचार करण्याऐवजी चुकीच्या पद्धतीने वाद निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची खंतही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.१०) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या झाला.

या कार्यक्रमात एफ वाय बी एम एस, एफ वाय बॅफ, एफ वाय बी कॉम, एस वाय बी कॉम व टी वाय बी कॉम या वर्गांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रसंगी पनवेल महानगरपालिका येथील प्रतिनिधी प्रिया चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रिया, मतदार नोंदणी तसेच देशाच्या सर्वांगीण विकासात मतदानाचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तसेच लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. सदर कार्यक्रमाचा समारोप मतदार प्रतिज्ञा घेऊन करण्यात आला. या प्रतिज्ञेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नागरी कर्तव्याची जाणीव, सामाजिक जबाबदारी व देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली.



या उपक्रमासाठी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे मोलाचे मार्गदर्शन व पाठिंब्याबद्दल तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आभार मानले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्रा. महेश धायगुडे समन्वयक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांनी केले तसेच दोन्ही समितीतील इतर सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# शासकीय रेखाकला परीक्षेत गव्हाण विद्यालयाचा १००% निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य कला संचालनालयांतर्गत राज्य कला शिक्षण मंडळाद्वारे सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला (रेखाकला) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला.

अ श्रेणी प्राप्त करणाऱ्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या १२, ब श्रेणी १५ तर क श्रेणी मध्ये १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सन २०२५ मध्ये झालेल्या या परीक्षेसाठी एलिमेंटरी व इंटरमिजीएट ग्रेड परीक्षा या दोन्ही स्तरावरील परीक्षेस विद्यालयातील एकूण ३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आणि सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ह्या दोन्ही स्तरावरील परीक्षेचा विद्यालयाचा निकाल १००% लागल्याबद्दल विद्यालयाचे हरहुन्नरी कला शिक्षक गणेश भोईर यांचेसह सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, प्राचार्या जोत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, शशिकला पाटील, रवींद्र भोईर, देवेंद्र म्हात्रे, संजय उगले आदींनी अभिनंदन केले.

नुकत्याच विभागीय स्तरावर झालेल्या प्रश्नमंजुषा, वक्तृत्व व गायन स्पर्धेमधील उल्लेखनीय कामगिरी व्यतिरिक्त शासकीय क्रीडा स्पर्धेमध्ये देखील अतिशय विलक्षण कामगीरी करून कला, क्रीडा, सांस्कृतिक, बुद्धीमत्ता आदी सर्व क्षेत्रांमध्ये चमकदार कामगिरी करून विद्यार्थी किंबहुना विद्यालय आपली बहुआयामी प्रतिभा अधोरेखीत करीत असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

# 'रयत'च्या राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत महात्मा फुले कॉलेजची उत्कृष्ट कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय रयत आविष्कार संशोधन स्पर्धा बुधवार २४ डिसेंबर २०२५ रोजी एस.एम.जोशी महाविद्यालय हडपसर, पुणे येथे झाली. या स्पर्धेत पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या विविध विभागातील विद्यार्थ्यांनी एकूण १५ संशोधन प्रकल्प सादर केले.

सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांपैकी ९ संशोधन प्रकल्पांना पारितोषिके प्राप्त झाली आहेत. ज्यामध्ये ३ प्रथम क्रमांक, ५ द्वितीय क्रमांक आणि १ तृतीय क्रमांकाचा समावेश आहे. विजेत्या विद्यार्थ्यांमध्ये रूपाली पोपेटा, काजल गायकवाड, मयूर पाटील, तन्वी झनकर, प्रार्थी म्हात्रे, हर्षदा नाईक, सुरक्षा वाघमारे, अक्षय वाडेकर, प्रतीक्षा ठक्कर यांचा समावेश आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, डॉ. प्रमोद ठाकूर, डॉ. यशवंत उलवेकर, प्रा. प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, प्रा. रवींद्र मोर्बेकर, प्रा. रोहन जितेकर व प्रा. नेहा मेहता या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले.



विशेष म्हणजे या राज्यस्तरीय स्पर्धेत महाविद्यालयाने नऊ पारितोषिके पटकावून संपूर्ण रयत शिक्षण संस्थेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.

विद्यार्थ्यांच्या व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांच्या या उज्ज्वल कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य प्रो. डॉ. लक्ष्मण गवळी, आंतरिक गुणवत्ता आश्वासन कक्षाचे समन्वयक प्रा. सोपान गोवे, आविष्कार कमिटीचे चेअरमन डॉ. प्रमोद ठाकूर व कमिटीतील सर्व सदस्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# गव्हाण विद्यालयात शालेय गुणवत्ता मानके पथक पर्यवेक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या नाविन्यपूर्ण शाळा तपासणी योजनेंतर्गत ह्या शैक्षणिक वर्षातील शालेय गुणवत्ता मानके मूल्यांकन पथक पर्यवेक्षण व आश्वासन आराखडा स्कॉफ पर्यवेक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये बुधवारी (दि.७) झाले.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य धनाजी पाटील उर्फ डी.बी.पाटील यांचे समवेत रयत संस्थेच्या शिक्षण समितीचे सदस्य तथा चारकोप शाखेचे मुख्याध्यापक दादासाहेब गावीत यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शाळेची गुणवत्ता, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, प्रशासकीय कामकाज, सामाजिक सहभाग, भौतिक सुविधा इ.मुद्द्यांच्या अनुशंगाने अंतर्बाह्य तपासणी केली.



या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी यांची विशेष उपस्थिती लाभलेल्या पथकामध्ये सदस्य तंत्रस्नेही शिक्षक प्रथमेश वाघोसकर (कुलाबा शाखा), दापोली शाखेच्या पर्यवेक्षिका संजिवनी घोडके, पोशेरे शाखेचे उपशिक्षक संजय सोनावणे, जासई शाखेच्या उपशिक्षिका निलिमा पाटील आणि उपशिक्षक संदिप गाताडी, वावंजे शाखेचे उपशिक्षक विश्वंभर भोईर, महात्मा फुले महाविद्यालय पनवेलच्या जुनिअर कॉलेज शिक्षिका सुनिता काटकर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय वाशी येथील ज्युनिअर कॉलेज शिक्षक दिनेश सासवडे आदींचा समावेश होता.

# रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात दि. रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सातारा यांच्या दिनदर्शिकेचे औपचारिक प्रकाशन उत्साहात झाले.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली दि. रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक ही महाराष्ट्रातील रयत सेवक नोकरांची अग्रगण्य सहकारी बँक म्हणून ओळखली जाते. सध्या बँकेचा एकूण व्यवसाय सुमारे २७०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून, संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यक्षेत्र असलेल्या या बँकेचा निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.


या वेळी कृष्णाजी कडू, ॲड. भार्गव पाटील, ॲड. मच्छिंद्र पाटील, प्राचार्य बबन साळुंखे, संगीता थोरात, प्रा. किशोर पाटील, प्रा. बाबूलाल पाटोळे, प्रमुख नवनीत ठाकूर सर प्रतिक वर्तक यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# शेडअभावी जंजिरा किल्ला पहायला येणारे पर्यटक त्रस्त

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरूड जंजिरा येथील खोरा बंदर परिसर कोकणातील सर्वात सुंदर ठिकाण आहे. एकदरा डोंगरापलीकडे समुद्राच्या कुशीत वसलेले समोर प्रसिद्ध जंजिराकिल्ल्यावर जाण्यासाठी बोटी कमी पडतात व पर्यटकांना तासनसात उन्हात उभे राहावे लागत आहे. त्यासाठी पार्कीगमध्ये सावलीसाठी शेड उभरण्याची गरज आहे



सध्या अस्तित्वात असलेली जुनी जेट्टी हि ओहटीच्या वेळी प्रवासी वाहतूक करणे अडचणीचे होत असल्याने सदरील कामास तातडीने निधी मंजूर करण्यात आला होता. सध्या बांधण्यात येणारी नवीन जेट्टी हि नव्या स्वरूपात बांधण्यात येणार असून सुमारे १५० मीटर पाण्याच्या आत नवीन जेट्टीचे काम केले जाणार असल्याने ओहटीच्या वेळी प्रवास करताना कोणताही त्रास प्रवासी वर्गाला होणार नाही. जुनी जेट्टीची लांबी कमी असल्याने ओहटीच्या वेळी प्रवासी होड्या अडकून पडत असत हि अडचण लक्षात घेऊन नवीन जेट्टी बांधण्यासाठी तिची लांबी वाढवण्यात आली आहे. खोरा बंदरातून सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांना सहज जाता येता यावे यासाठी हि जेट्टी खूपच उपयुक्त ठरणार आहे.

जंजिरा किल्ल्यावर दरवर्षी राजपुरी व खोरा बंदरातील जेट्टीवरून सात लाखांपेक्षा जास्त पर्यटक या किल्ल्यास भेट देत असतात. पर्यटकांच्या माध्यमातून प्रत्येक प्रवासी वर्गाच्या मागे ठराविक लेवी कर आकारला जाऊन त्याचे उत्पन्न महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डास मिळत असते.

जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यापर्यंत पोहचवले जाते. या दोन्ही बंदरात तुफान गर्दी सुट्टीच्या हंगामात होत असते. त्यामुळे खोरा बंदरातील नवीन जेट्टी हि वरदायी ठरणार आहे. लांबी व रुंदी जास्त असल्याने या जेट्टीवर शेकडो पर्यटक अगदी सहज चढू व उतरू शकणार आहेत.

ओहोटीच्या वेळी नवीन जेट्टी खूपच आवश्यक ठरणार असून पर्यटकांना खोळम्बा होणार नाही. सध्या खोरा बंदरातील नवीन जेट्टीचे काम युद्धपातळीवर न थांबता सुरू असल्याने मे अखेर पर्यंतच्या आत हे काम पूर्ण होणार असून पर्यटकांना लाभ होणार आहे.

## खालापुरात महिलेचा विनयभंग

### कर्जत येथील व्यक्तीवर गुन्हा

**खोपोली : प्रतिनिधी**

रस्त्यावरून पायी चालत निघालेल्या महिलेचा दिलीप शंकर शिंदे राहणार दहिवली कर्जत यांनी विनयभंग केल्याची घटना खालापुरात घडली आहे.

पिडित महिलेची शुक्रवारी (दि.९) खालापूर कोर्टात तारीख होती. कोर्टात हजर राहून पुढील तारीख मिळाल्याने पिडिता वकिलाकडे पायी जात असताना पाठीमागून आरोपी दिलीप शिंदे कार घेऊन आला. पिडितेच्या समोर कार थांबवून तिला अश्लील शब्द आणि मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य दिलीप याने केले. पिडितेने याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. दिलीप शिंदे विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार कीर्ती कांबळे करत आहेत.

## खोपोलीत विकासाचे चक्र गतिमान होणार –कुलदीपक शेंडे

**खोपोली : प्रतिनिधी**

अटीतटीच्या निवडणुकीत विजय मिळाल्यावर २६ तारखेला शिवसेना नगरसेविका पती मंगेश काळोखे हत्येच्या दुःखद घटनेनंतर खोपोली शहर हादरले होते. अशा स्थितीत अतिशय साधेपणाने नगराध्यक्ष पदाचा कारभार शिवसेनेचे कुलदीपक शेंडे यांनी स्वीकारला व कामाला सुरुवात केली. या दरम्यान बोलतांना शहरातील प्रमुख समस्यांना प्रथम प्राथमिकता देण्यात येईल.



यात नगरपालिका रुग्णालय, नागरी स्वच्छता, शुद्ध पाणी पुरवठा, रस्त्यांची कामे व छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह व नाट्यगृह आदी कामे पूर्णत्वास नेण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न केले जातील असे नवनिर्वाचित नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी सांगितले. तसेच आगामी काळात शहरातील विकासाचे चाक अधिक गतिमान होईल हे ही त्यांनी आवर्जून सांगितले. पत्रकारांसाठी पत्रकार भवन उभारणार असल्याचे त्यांनी घोषित केले.

यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना प्रमुख नेते व उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य मंत्री यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभणार असल्याचे ही शेंडे यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात महत्वाची विकास कामे मार्गी लागतील सोबत विविध प्रभागातील गार्डन, उद्याने, सुशोभीकरण कामे ही पूर्णत्वास आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. खोपोली शहराला सर्व सुविधायुक्त सुंदर व स्वच्छ शहर करण्यासाठी एकत्रितपणे कामकाज करून ध्येय पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील हे ही कुलदीपक शेंडे यांनी आवर्जून सांगितले.

## भुवन आदिवासीवाडीत आरोग्य तपासणी व जनजागृती उपक्रम



**माणगाव : प्रतिनिधी**

भुवन आदिवासी वाडी व वडाची वाडी परिसरात आरोग्य विभागाच्या वतीने ताप व रक्त नमुना तपासणी करण्यात आली. या वेळी एकूण तीन जणांचे ताप व रक्त नमुने घेण्यात आले.

याच अनुषंगाने वरदायिनी विद्यालय, महागाव येथील हायस्कूल विभागातील विद्यार्थ्यांना हिवताप (मलेरिया), परिसर स्वच्छता तसेच वैयक्तिक स्वच्छता या विषयांवर आरोग्य शिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांना आजाराची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, स्वच्छतेचे महत्त्व आणि आरोग्यदायी सवयी याबाबत आरोग्यसेवक सुधीर खैरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास वरदायिनी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यवहारे सर, हेमंत बारटक्के सर, माळी सर, कजबजे सर तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनात हा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

## प्री–मॅट्रीक व पोस्ट मॅस्ट्रिक शिष्यवृत्तीसाठी अर्जाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता ५ मे २०२२ रोजीच्या पत्रान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्यामार्फत भारत सरकारच्या PMAYASASVI (Young Achievers Scholarship Award Scheme for Vibrant India) या एकत्रित शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांची राज्यात अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

याकरिता राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रीक व पोस्ट मॅस्ट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ उपलब्ध असून पात्र विद्यार्थ्यांनी NPS (National Scholarship Portal) करिता अर्ज सादर करावेत असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण रायगड–अलिबाग सुनिल जाधव यांनी केले आहे.

प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी :- लागू प्रवर्ग ओबीसी, व्हीजेएनटी, डीएनटी, एसबीसी, शाळा शासनमान्य असणे आवश्यक, वार्षिक उत्पन्न मर्यादा दोन लाख ५० हजार, किमान उपस्थिती ७५ टक्के, इतर शिष्यवृत्ती घेता येणार नाही, शिष्यवृत्ती रक्कम रु.४ हजार वार्षिक, दोन मुलांपर्यंत लाभ (मुलींसाठी मर्यादा नाही.).

पोस्ट मॅस्ट्रिक शिष्यवृत्ती इयत्ता ११ वी ते पदव्युत्तर/ व्यावसायिक अभ्यासक्रम :- लागू प्रवर्ग ओबीसी, व्हीजेएनटी, डीएनटी, एसबीसी, वार्षिक उत्पन्न मर्यादा दोन लाख ५० हजार, किमान उपस्थिती ७५ टक्के, एफआरए/मान्य प्राधिकरण मान्य अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती, रक्कम डिबीटीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात, अभ्यासक्रम मध्यंतरी सोडल्यास शिष्यवृत्ती रद्द व रक्कम परत करावी लागेल.

अर्ज प्रक्रिया छाड (National Scholarship Portal), विद्यार्थ्यांना https://scholarship.gov.in, या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक. अर्ज करताना जात प्रमाणपत्र, जातवैधता (लागू असल्यास), उत्पन्न प्रमाणपत्र, आधार लिंक बँक खाते,बोनफाईड प्रमाणपत्र, मागील वर्षाचे गुणपत्रक, Aadhar Authenticated Attendance–७५ टक्के ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थी, सर्व प्राचार्य, कर्मचारी यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज तत्काळ व अचूक भरावेत. सर्व शाळा, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यास सहकार्य करावे, सर्व पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहू नयेत.

## सिकलसेल मुक्तीसाठी १५ जानेवारीपासून विशेष अभियान

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमिया या आनुवंशिक आजाराचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने आरोग्य विभाग सज्ज झाला असून आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार १५ ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' राबविण्यात येणार आहे. या विशेष अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील ४० वर्षांपर्यंतच्या सर्व नागरिकांची प्राथमिक सिकलसेल तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीदरम्यान संशयित रुग्ण व वाहकांची नोंद घेऊन आवश्यकतेनुसार एचपीएलसी (HPLC) किंवा इलेक्ट्रोफोरेसिस या प्रगत तपासण्या केल्या जाणार आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जिल्हा आरोग्य यंत्रणा या अभियानासाठी सज्ज झाली आहे. अभियानादरम्यान ४० वर्षांपर्यंतच्या नागरिकांची प्राथमिक तपासणी केली जाईल. संशयित रुग्णांची सखोल तपासणी करून त्यांना औषधोपचार, समुपदेशन व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन दिले जाणार आहे. भावी पिढीला या आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशनावर विशेष भर देण्यात येणार आहे.

अभियान यशस्वी करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती उपक्रम, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानासाठी जिल्हा आरोग्य विभागाची एकूण २९७ पथके सिकलसेल तपासणी व समुपदेशनावर काम करणार असून यामध्ये आरोग्य सेविका, एएनएम, आशा स्वयंसेविका व समुदाय आरोग्य अधिकारी कार्यरत असणार आहेत.

## साने गुरूजी माध्यमिक विद्यालयाचे एलिमेंटरी, इंटरमिजिएट परीक्षेत सुयश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील सहयोग प्रतिष्ठान संचालित साने गुरूजी माध्यमिक विद्यालय लोहारेच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबईतर्फे घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परिक्षेमध्ये सुयश प्राप्त केले असून एलिमेंटरी चित्रकला परिक्षेत २२ तर इंटरमिजिएट परिक्षेमध्ये १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एलिमेंटरी चित्रकला परिक्षेत ए ग्रेडमध्ये पूर्वा देवे, विराज पवार, बी ग्रेडमध्ये ऋषभ सुतार यश केसरकर, रुद्र जाधव, समीक्षा चिकणे, सानवी चौधरी, श्रध्दा उतेकर, सिध्दी देवे, स्वयंम पारकर, तन्वी पार्टे, अदिती वाडकर, अमोघ खरे, आनंदी भंडलकर, आर्या सोनवणे, कस्तुरी इंगवले तर सी ग्रेडमध्ये धीरज तुढीलकर प्रज्ञा घावरे, दामिनी दराडे, अपेक्षा कदम, वैष्णवी पवार, अभय तुर्डे हे उत्तीर्ण झाले आहेत.

इंटरमिजिएट चित्रकला परिक्षेत ए ग्रेडमध्ये प्रांजल भोये, खुशी निकम, आर्या सलागरे, शुभेच्छा मांढरे, सानवी पवार, बी ग्रेडमध्ये समर्थ मोरे, संचित उतेकर, श्रावणी इंगवले, आर्या म्हस्के, निधी चव्हाण, निखिल नरे, पल्लवी सुतार, वेदांत सकपाळ, रोहन चिंचघरकर तर सी ग्रेडमध्ये सुयश शिंदे, प्रेम घाडगे, आयान लोखंडे यांचा समावेश आहे.

चित्रकला परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे चित्रकला शिक्षक देवधरकर यांचे तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था व पालकांतर्फे अभिनंदन करण्यात आले.

## धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचा शुभारंभ आज करण्यात आला. हे शिबीर सात दिवस चालणार असून परिसरातील गावांमध्ये जाऊन शिबिरार्थी विद्यार्थी श्रमदान करणार असून विविध विषयांवर जनजागृती करणार आहेत.



तालुक्यातील वेणगाव येथील श्री महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सरपंच अश्विनी पालकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी श्री महालक्ष्मी देवस्थानचे अध्यक्ष रंजन दातार, विवेक जोशी, मंगेश पालकर, डॉ. अतुल त्रिपाठी, प्रा. निलेश बोंडे, प्रा. अनिकेत इंदुलकर आदी उपस्थित होते.

महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. त्रिपाठी यांनी ग्रामीण भागातील जीवनमान आपल्याला या शिबिरामुळे कळेल, असे सांगितले. मांडे यांनी, या सात दिवसात तुमचे राहणीमान नक्कीच बदलेल. जे काम कराल ते मन लावून करा. संयम आणि आत्मविश्वास तुम्हाला यशपर्यंत घेऊन जाईल.' असे सांगितले. सूत्रसंचालन भाग्यश्री पोतदार व प्रतिक सातपुते या विद्यार्थ्यांनी केले. या वेळी प्रा. पूजा मोधळे, विजय जिनगरे, विनय रामदासी, सुहास गुप्ते, अर्जुन गोरखा, निशिकांत मोधळे, अलीम शेख आदी उपस्थित होते.

## शिपुरकर शाळेत विद्यार्थ्यांनी साकारली विविध वेशभूषा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर इंग्रजी माध्यमाच्या शाळेत यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या वेशभूषा स्पर्धेने विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, सर्जनशीलतेला आणि संस्कारक्षम शिक्षणाला नवे आयाम दिले.



या स्पर्धेत सहभागी झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अफलातून वेशभूषा, त्यामागील विचारसरणी आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण पाहून उपस्थित पालक अक्षरशः थक्क झाले. शाळेचे संपूर्ण वातावरण रंग, आनंद आणि संस्कृतीच्या सुगंधाने भारावून गेले होते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच शाळेचा मुख्य उद्देश असून त्यासाठी अभ्यासाबरोबरच सांस्कृतिक, सामाजिक व नैतिक मूल्यांची जोपासना करणारे विविध उपक्रम राबविले जातात. वेशभूषा स्पर्धा हा त्यातील एक महत्त्वाचा उपक्रम आहे. यावर्षीही ही स्पर्धा मोठ्या उत्साहात घेण्यात आली असून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि पालकांचा सक्रिय पाठिंबा यामुळे हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी केवळ वेशभूषा परिधान केल्या नाहीत, तर त्या वेशभूषेमागील व्यक्तिरेखांची माहिती, त्यांचे कार्य आणि समाजाला दिलेले योगदानही आत्मसात केले. सैनिक, डॉक्टर, वकील आणि शेतकरी यांच्या वेशभूषांतून समाजातील विविध घटकांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

देवी-देवतांच्या वेशभूषांतून भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, कला आणि परंपरेचे दर्शन घडले. त्याचबरोबर रोबोट, संगणक, स्पायडर मॅन, ड्रॅक्युला यांसारख्या आधुनिक व कल्पनाविश्वातील व्यक्तिरेखांमुळे मुलांच्या सर्जनशीलतेची आणि कल्पकतेची झलक पाहायला मिळाली.

## शहीद वीर यशवंतराव घाडगे जयंती

**माणगाव : बातमीदार**

शहीद वीर यशवंतराव घाडगे, मरणोत्तर व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्हधारक यांचा जयंती समारंभ शुक्रवारी (दि.९) प्रांत कार्यालय, माणगाव समोरील प्रांगणातील वीर यशवंतराव घाडगे स्मारकात देशभक्तिपर वातावरणात उत्साहात झाला.


या कार्यक्रमास सी.एस.डी. कॅन्टींग ऑफिसर महाड कर्नल किशोर महादेव मोरे, माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुरेश गायकवाड, घाडगे उत्सव समितीचे सचीव तथा तहसीलदार माणगाव विपीन लोकरे, माणगांवचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, माजी अध्यक्ष, माजी सैनिक संघटना, माणगाव तळा तालुका विष्णु सावंत, मराठा लाईट इन्फंट्री रेजीमेंट सेंटर, बेळगाव यांचे प्रतिनिधी सुभेदार सुशांत दिक्षित, प्रवीण शिंदे, अक्षय पाटील, राहुल ढोबे, माजी सैनिक कॅप्टन रंधावा, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजय (अण्णा) साबळे, गड किल्ले संवर्धन अभ्यासक रामजी कदम, रायगड भूषण जेष्ठ पत्रकार रविंद्र कुवेसकर, वीर यशवंतराव घाडगे आजी माजी सैनिक संघटना सचिव ऋषिकेश शिंदे, खजिनदार स्वप्निल वाघ, सहसचिव प्रकाश मोरे, महेंद्र गजमल, सुभेदार दीपक भोनकर आदी उपस्थित होते.

या वेळी दोन वीर पत्नींचा सन्मानपूर्वक विशेष सत्कार देखील करण्यात आला, साबळे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुरेल स्वागत गीत गाऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली, तर वीर घाडगे यांचा जीवनपट आपल्या वीर रसाने ओतप्रोत भरलेल्या पोवाड्यातून श्री. व गोसावी गुरुजी यांनी त्यांचे खास शैलीत उपस्थितांसमोर सादर केला.

यानंतर उपस्थित मान्यवरांनी शहिद वीर यशवंत घाडगे यांची ऐतिहासिक शौर्यगाथा या प्रेरणादायी उत्सवानिमित्त आपल्या मनोगतातून त्यांचे प्रती आपल्या भावना व्यक्त केल्या.



## वडगावमधील शाळेची माजगाव केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत कामगिरी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा तळवली येथे पार पडलेल्या माजगाव केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत वडगाव शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक बक्षिसे जिंकून आपला दबदबा कायम ठेवला आहे.

प्रथम १९ पैकी ८ प्रथम,१९ पैकी २ द्वितीय,१९ पैकी ४ तृतीय १५ पारितोषिकांवर वडगाव शाळेचे नाव मुलांनी कोरले आहे. यात इयत्ता दुसरी ची विभा दळवी दोरी उड्या ३ रा, विभा दळवी पोते उडी १ला, देवांश पोते उडी १ला, धनराज पोते उडी –१ ला, रुद्राणी जाधव धावणे–३ रा, कैवल्य धावणे १ ला, वैभवी गडगे धावणे १ ला, मनस्वी गडगे दोरी उड्या १ ला,उर्मिला कातकरी चमचा लिंबू १ला, अनिकेत कातकरी दोरी उड्या ३ रा,कबड्डी मोठा संघ प्रथम, लंगडी मोठा गट दुसरा, मंथन कोडिलकर बेडूक उड्या ३ रा,सौरभ कातकरी बेचकी २ रा,आर्यन भोईर बेचकी ३ रा या विद्यार्थ्यांनी बाजी मारली.

सर्व विद्यार्थ्यांचे आज शाळेत शाळा व्यवस्थापन समितीच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या स्पर्धांसाठी मुख्याध्यापक सुभाष राठोड, सह शिक्षक वैजनाथ जाधव, पदवीधर विषय शिक्षिका मयुरी धायगुडे, स्वयं सेवक संकेत काठोळे यांनी मार्गदर्शन केले.

# डब्ल्यूपीएलमध्ये गुजरातची यूपीवर मात

## लिचफिल्डची झुंज अयशस्वी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महिला प्रीमियर लीगमध्ये डॉ.डी.वाय. पाटील स्टेडियमवर शनिवारी झालेल्या चुरशीच्या हाय-स्कोअरिंग सामन्यात गुजरात जायंट्सने यूपी वॉरियर्सचा १० धावांनी पराभव केला. ॲश्ले गार्डनर आणि जॉर्जिया वेअरहॅम यांच्या लक्षवेधी योगदानामुळे जायंटस्ने स्पर्धेत विजयी सुरुवात केली.

प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आल्यानंतर जायंट्सची सलामीवीर जोडी सोफी डिव्हाईन आणि बेथ मुनी यांनी संघाला आश्वासक सुरुवात करून दिली. त्यांनी पहिल्या विकेटसाठी ४१ धावा जोडल्या. नंतर डिव्हाईनने २० चेंडूंत पाच चौकार, दोन षटकारांसह ३८ धावांची वेगवान खेळी केली. दोन विकेटस् झटपट पडल्यानंतर कर्णधार ॲश्ले गार्डनर आणि पदार्पण करणारी अनुष्का शर्मा यांनी



६३ चेंडूंत १०३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. शर्मा ४४ धावांवर बाद झाली, तर गार्डनरने आक्रमक खेळ करत ४१ चेंडूंत ६५ धावांची दमदार खेळी केली. डावाच्या शेवटी जॉर्जिया वेअरहॅमने केवळ १० चेंडूंत नाबाद २७ धावांची स्फोटक खेळी केली. यात डिएंड्रा डॉटिनच्या एका षटकात मारलेल्या तीन षटकारांचा समावेश होता.

२०८ धावांच्या डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करताना यूपी वॉरियर्सला डब्ल्यूपीएल इतिहासातील सर्वात मोठा यशस्वी पाठलाग करण्याची संधी होती, मात्र त्यांची सुरुवात खराब झाली. सलामीच्याच षटकात रेणुका सिंगने किरण नवगिरेला बाद केले. कर्णधार मेग लॅनिंग (३०) आणि फोबी लिचफिल्ड यांनी ७० धावांची भागीदारी करत डाव सावरला, पण वेअरहॅमने एकाच षटकात लॅनिंग आणि हरलीन देओलला बाद करून सामन्यात पुन्हा चुरस निर्माण केली.

एका बाजूने विकेटस् पडत असताना लिचफिल्डने किल्ला लढवला. तिने ४० चेंडूंत आठ चौकार आणि पाच षटकारांसह ७८ धावांची उत्कृष्ट खेळी केली. श्वेता सेहरावतने २५ धावा करत तिला साथ दिली, मात्र अखेरच्या टप्प्यात आवश्यक धावगती वाढल्याने वॉरियर्सचा संघ ढेपाळला आणि त्यांना ८ बाद १९७ धावांपर्यंतच मजल मारता आली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची कुस्ती स्पर्धेत चमकदार कामगिरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खोपोलीत आयोजित राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विद्यार्थ्यांनी सुवर्ण व रौप्यपदकांची कमाई केली.

यामध्ये हंसाली पाटील (प्रथम वर्ष वाणिज्य व्यवस्थापन अभ्यासक्रम), शिवसुंदर साहू (द्वितीय वर्ष कला व वित्त अभ्यासक्रम), वेदांत म्हात्रे (प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रम), सानिया



शेख (द्वितीय वर्ष वाणिज्य अभ्यासक्रम), आणि रवींद्र शेळके (महाविद्यालयाचे कर्मचारी) यांनी सुवर्ण, तर आर्यन भातोसे याने रौप्यपदक पटकाविले. सुवर्णपदक विजेत्यांची पुढील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मुंबईने उघडले विजयाचे खाते

## दिल्लीचा डब्ल्यूपीएलमध्ये सर्वात मोठा पराभव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सच्या संघाने दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यातील विजयासह यंदाच्या हंगामातील पहिल्या विजयाची नोंद केली आहे. दुसरीकडे जेमिमासह दिल्ली कॅपिटल्सच्या संघाच्या नावे लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे. मुंबईने निर्धारित २० षटकात चार विकेट्सच्या मोबदल्यात १९५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दिल्लीचा डाव १९ षटकात १४५ धावांवर आटोपला.

एका बाजूला मुंबई इंडियन्सच्या संघाने प्रतिस्पर्धी संघाला सातव्यांदा ऑलआउट केले. दुसऱ्या बाजूला दिल्ली कॅपिटल्सच्या संघ सर्वाधिक सातव्यांदा ऑलऑउट झाला. एवढेच नाही तर दिल्ली कॅपिटल्सच्या संघाचा डब्ल्यूपीएलमधील हा सर्वात मोठा पराभव ठरला. याआधी २०२५च्या हंगामात दिल्लीला यूपी वॉरियर्सच्या



संघाने ३३ धावांनी पराभूत केले होते. आता मुंबई इंडियन्सने दिल्लीला ५० धावांनी शह दिला.

जेमिमा रॉड्रिग्स डब्ल्यूपीएलमध्ये पहिल्यांदाच दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व करण्यासाठी मैदानात उतरली. मैदानात नाणेफेकीसाठी उतरल्यावर ती डब्ल्यूपीएलमधील सर्वात युवा कर्णधार ठरली, पण सामन्यातील पराभवामुळे तिच्यावर पदार्पणात पराभव पत्करणारी कॅप्टन असा टॅग लागला. ती जीवलग मैत्रिण स्मृतीच्या क्लबमध्ये सामील झाली. डब्ल्यूपीएलमध्ये कॅप्टन्सीच्या पदार्पणात पराभवाचा सामना करणारी ती स्मृती मानधना, स्नेह राणा, दीप्ती शर्मानंतर चौथी भारतीय कर्णधार ठरली. फक्त हरमनप्रीत कौर एकमेव भारतीय कर्णधार आहे, जिने डब्ल्यूपीएलमधील कॅप्टन्सीच्या पदार्पणात संघाला विजय मिळवून दिला होता.

# दिग्गज विश्वनाथन आनंदला रोखत रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत निहाल विजेता

**कोलकाता : वृत्तसंस्था**

प्रतिष्ठित टाटा स्टील रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत ग्रँडमास्टर निहाल सरिनने आपल्या प्रगल्भ खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर नाव कोरले. स्पर्धेच्या निर्णायक टप्प्यात महान खेळाडू विश्वनाथन आनंदला बरोबरीत रोखत निहालने नव्या वर्षाची शानदार सुरुवात केली. विशेष म्हणजे विश्वविजेत्या डी. गुकेशने स्पर्धेतून माघार घेतल्याने निहालला 'वाईल्ड कार्ड'द्वारे ऐनवेळी पाचारण करण्यात आले होते. या संधीचे त्याने ऐतिहासिक जेतेपदात रूपांतर केले.

पहिल्या दिवशी अवघ्या १.५ गुणांसह संथ सुरुवात करणाऱ्या निहालने दुसऱ्या सत्रापासून आक्रमक पवित्रा घेतला. पुढील सहा फेऱ्यांमध्ये त्याने प्रज्ञानंद आणि विश्वनाथन आनंद यांसारख्या दिग्गजांना बरोबरीत रोखत, तर इतर चार फेऱ्यांमध्ये विजय मिळवत पाच गुणांची कमाई केली. अलीकडेच २,७०० रेटिंग गुणांचा टप्पा ओलांडणाऱ्या निहालने या विजयाद्वारे गुकेश, प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगेसी यांच्यासारख्या समकालीन जागतिक कीर्तीच्या खेळाडूंच्या पंक्तीत स्वतःचे स्थान अधोरेखित केले आहे.



### दिवंगत आजोबांना विजय समर्पित

निहालसाठी हे जेतेपद भावनिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरले. ज्या आजोबांनी त्याला बुद्धिबळाचे बाळकडू दिले, त्यांचे गुरुवारी रात्री म्हणजेच विजयाच्या पूर्वसंध्येला निधन झाले. आपल्या भावना शब्दबद्ध करताना तो म्हणाला, आजोबांनीच मला या खेळाची ओळख करून दिली आणि माझ्या बुद्धिबळ प्रवासाचा पाया रचला. त्यामुळे हे यश पूर्णतः त्यांना समर्पित करत आहे. विशेष म्हणजे स्पर्धेच्या निर्णायक टप्प्यात दिग्गज खेळाडू विश्वनाथन आनंदला बरोबरीत रोखले होते. नंतर त्याने विजेतेपदाला गवसणी घातली.




## हर्षिणी चव्हाणला वेटलिफ्टिंगमध्ये सुवर्णपदक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या हर्षिता प्रशांत चव्हाण हिने स्नॅच ६२ किलो क्लिनजर्क ८० किलो असे एकूण १४२ किलो वजन उचलून अस्मिता खेलो इंडिया युथ वेटलिफ्टींग स्पर्धेमध्ये १७ वर्ष वयोगटातील ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. उत्तर प्रदेशच्या गाझियाबादमधील मोदीनगर येथे ही स्पर्धा झाली.

हर्षिता ही राष्ट्रीय कबड्डी खेळाडू, प्रो-कबड्डी स्टार व शिवछत्रपती मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त प्रशांत चव्हाण यांची सुकन्या आहे. या स्पर्धेचे बक्षीस वितरण भारताची वेटलिफ्टर पद्मश्री पुरस्कार विजेती मिराबाई चानू यांच्या हस्ते करण्यात आला. या यशाबद्दल हर्षिताचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# पनवेलमधील कोप्रोली येथे क्रिकेट स्पर्धा

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कोप्रोली येथे श्री गावदेवी क्रिकेट संघाच्या वतीने वै. हभप गणपतबुवा पाटील स्मृती चषक २०२६ भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. १०) झाले.

यंदाचे स्पर्धेचे ११वे वर्ष आहे. कोप्रोली येथील क्रीडांगणावर रंगणाऱ्या या स्पर्धेत एकूण ४८ संघ सहभागी झाले असून १० ते १४ जानेवारीदरम्यान सामने खेळले जाणार आहेत.




या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजप अनुसूचित जाती मोर्चा सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, संजय पाटील, सुनील पाटील, रवी नाईक आणि माजी सरपंच रमेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद दवळे, विनोद पाटील, रोशन पाटील, रोहित पाटील, धनाजी म्हस्कर, कुलदीप पाडवी, संतोष पाटील, धनंजय पाटील, लक्ष्मण फडके आणि बाळाराम फडके यांच्यासह प्रफुल्ल पाटील, मनीष पाटील, राकेश पाटील, संतोष म्हस्कर, गुरुनाथ ठाकूर, दिनेश ठाकूर, जगदीश ठाकूर, अशोक फडके, महेश शहा, कृष्णा शहा, कृष्णा फडके, जनार्दन फडके, जिनानात फडके, रूपेश फडके, अमर फडके, विशाल पाटील, युवराज पाटील, मिथुन पाटील व किरण पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वर्ल्डकप सराव सामन्यात वैभव सूर्यवंशीची वादळी खेळी

**बुलवायो** : आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील १९ वर्षांखालील भारतीय संघ अंडर-१९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धेसाठी सज्ज आहे. १५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत वैभव सूर्यवंशीवर सर्वांच्या नजरा असतील. यंदाच्या वर्ल्डकप मोहिमेला सुरुवात करण्याआधीच १४ वर्षीय बॅटरने सराव सामन्यात स्कॉटलंडच्या गोलंदाजांची येथेच्छ धुलाई करत शड्डू ठोकला आहे.

स्कॉटलंड अंडर-१९ संघाविरुद्ध वैभव सूर्यवंशीने कर्णधार आयुष म्हात्रेसोबत डावाची सुरुवात केली. पहिल्याच षटकांपासून आक्रमक फलंदाजी करत त्याने गोलंदाजांचे खांदे पाडले. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी केली. कर्णधार आयुष म्हात्रे २२ धावा करून बाद झाला. यानंतर वैभवने एरॉन जॉर्जसोबत डाव सावरत धावांचा वेग कायम ठेवला. वैभव सूर्यवंशीने फक्त ५० चेंडूंत ९६ धावा केल्या. या खेळीत त्याच्या बॅटमधून नऊ चौकार आणि सात षटकार आल्याचे पहायला मिळाले.

**पाहिजेत**

**कॉम्प्युटर ऑपरेटर**

**ऑफिस असिस्टंट**

**मार्केटिंग एक्सिक्युटिव्ह**

**डिलीव्हरी पिकअप बॉय**

पत्ता :- स्मार्ट कुरियर सर्व्हिस प्रा.लि. ऑफिस नं २४ विध्या कमरशियल कॉम्प्लेक्स सेक्टर ११, सी.बी.डी बेलापूर, **मो. ९९३००२३५५२**

# नीरजची प्रशिक्षकाशी फारकत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा दिग्गज भालाफेकपटू आणि दोन ऑलिम्पिक पदकांचा मानकरी नीरज चोप्राने प्रशिक्षक यान झेलेझनी यांच्यापासून आपण फारकत घेत असल्याची घोषणा केली. २०२४च्या पॅरिस ऑलिम्पिकनंतर नीरजने झेलेझनी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणास सुरुवात केली होती.

२८ वर्षीय नीरज चोप्रा सध्या पाठीच्या दुखापतीतून सावरत आहे. याच दुखापतीमुळे गेल्या वर्षी टोकिओ येथे झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत त्याला आठव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

आपल्या निवेदनात नीरजने म्हटले की, यान झेलेझनी यांच्यासोबत काम केल्यामुळे तंत्र, लय आणि हालचालींबाबत अनेक नवे दृष्टिकोन लाभले. प्रत्येक सत्रातून मला खूप काही शिकायला मिळाले. ते केवळ इतिहासातील सर्वोत्तम भालाफेकपटूच नाहीत, तर एक उत्तम व्यक्तिमत्त्वदेखील आहेत.

झेलेझनी यांनीही नीरजचे कौतुक केले. नीरजसारख्या खेळाडूला प्रशिक्षण देणे हा एक विलक्षण अनुभव होता. आम्ही एकत्र काम केले आणि त्याने पहिल्यांदा ९० मीटरचा टप्पा ओलांडला याचा मला आनंद आहे, असे ते म्हणाले.

> **मी २०२६कडे मोठ्या आशेने पाहत आहे. नोव्हेंबरच्या सुरुवातीपासूनच मी सरावाला सुरुवात केली आहे. तंदुरुस्त राहणे हेच माझे मुख्य ध्येय असून लवकरच पुनरागमन करण्यासाठी उत्सुक आहे. २०२७ची जागतिक अजिंक्यपद स्पर्धा आणि २०२८ची लॉस एंजेलिस ऑलिम्पिक हे माझे दीर्घकालीन लक्ष्य आहे. -नीरज चोप्रा**

## मैदानात उतरताच विराटने टाकले गांगुलीला मागे

**वडोदरा : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्धच्या वडोदराच्या मैदानात फलंदाजीसाठी मैदानात उतरण्यापूर्वीच विराट कोहलीने खास विक्रमाला गवसणी घातली. कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. फिल्डिंगसाठी मैदानात उतरताच विराटने क्रिकेटच्या मैदानातील दादा आणि भारतीय संघाची बांधणी करणारा कर्णधार सौरव गांगुलीला मागे टाकले.

विराट वडोदराच्या मैदानात त्याचा ३०९वा वनडे सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला. भारताकडून सर्वाधिक वनडे खेळणाऱ्या आघाडीच्या पाचमध्ये त्याची एन्ट्री झाली आहे. सौरव गांगुलीने कारकिर्दीत ३०८ वनडे सामन्यात भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व केले होते. सर्वाधिक एकदिवसीय सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर सर्वात आघाडीवर आहे. त्याने आपल्या मोठ्या कारकिर्दीत ४६३ वनडे सामने खेळले आहेत. हा एक विश्वविक्रमच आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com